अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड


## आज सकाळी ११ वाजता शहरातील मुख्य चौका-चौकात होणार सामूहीक राष्ट्रगीत



**सोलापूर** : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे अनुषंगाने आज दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता सामुदायिकरीत्या राष्ट्र गायनाचे आयोजन करणेबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झालेले आहेत.

त्यानुसार शहरातील नागरिकांमध्ये देशभक्ती वृध्दींगत होवून सद्भावना निर्माण होण्याचे दृष्टींने सोलापूर शहरातील चौकां-चौकांमध्ये सर्व वाहतूक सिग्नल्स यांना लाल दिवे लावून सर्व वाहतूक ५२ सेकंदासाठी थांबविण्यात येऊन चौकातील उपस्थित नागरिकांकडून सामुदायिकरीत्या राष्ट्रगीत गायन करून घेण्यात येणार आहे.

तरी याद्वारे सोलापूर शहरातील सर्व नागरिकांनी १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता सामुदायिकरीत्या राष्ट्र गान कार्यक्रमांचे आयोजन करून सामुदायिकरीत्या राष्ट्र गीत गावून देभभक्ती व सद्भावना वाढविण्यास हातभार लावून देशभक्ती दाखवून द्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.


www.surajyadigital.com बुधवार, दि. १७ ऑगस्ट २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३१८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८ + ८


# आठवड्यापूर्वी जिवे मारण्याचा ‘डाव’ फसला पत्नीच्या आक्रोशाने ‘घातपात’चा संशय वाढला

## विश्वासू कार्यकर्त्याने सांगितली ‘आपबिती’, पोलिसांनाही बसली ‘धास्ती’

**सुराज्य/सोलापूर**

**शिवसंग्रामचे दिवंगत नेते माजी आमदार विनायक मेटे यांच्या कारला अपघात झाला नसून तो घातपात असल्याचा संशय बळावत चालला आहे. त्यामुळे या घटनेचा तपास करणाऱ्या पोलीस यंत्रणेपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे. मेटे यांच्या पत्नी ज्योती यांनी स्वतःच हा घातपात असल्याची शंका व्यक्त केल्याने या प्रकरणाला वेगळी कलाटणी मिळणार, असे दिसते. रविवारी पहाटे पुणे-मुंबई महामार्गावरील पनवेलजवळच्या मडप बोगद्याजवळ झालेल्या अपघाताची पोलिसांकडून चौकशी सुरू असतानाच ज्योती मेटे यांनी अपघाताच्या त्या दोन तासात काय झाले? याची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी केल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.**

अशातच आता सोशल मीडियावर एक ऑडिओ क्लिप व्हायरल केली जात आहे. त्यातील आवाज अपघातापूर्वी मेटे यांच्यासोबत असलेले आणि त्यांचे निकटवर्तीय अण्णासाहेब मायकर यांचा असल्याचा दावा केला जात असून या ऑडिओ क्लिपमधून तीन ऑगस्टला सुध्दा मेटे यांच्या गाडीला अपघात करण्याचा प्रयत्न केला गेल्याचे सांगितले गेले आहे. या प्रकरणानंतर ज्योती मेटे यांनी स्वतः मायकर यांच्याशी संवाद साधल्याने घातपाताचा संशय वाढला आहे.




### उत्तरे समाधानकारक नाहीत

मेटे यांच्या गाडीचा चालक एकनाथ कदम याची कसून चौकशी केली जात आहे. मात्र, त्याच्याकडून पोलिसांना समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याची माहिती समोर आली आहे. तो सतत आपला जबाब बदलत आहे. पोलिसांकडून आता विनायक मेटे यांच्या गाडीचा चालक आणि मेटे यांच्या अंगरक्षकाच्या फोन कॉलचा डेटा तपासला जाणार आहे. पोलिसांकडून विनायक मेटे यांच्या अपघातावेळी मुंबई-पुणे एक्सप्रेस वे मार्गावरून जाणाऱ्या वाहनांचे सीसीटीव्ही फुटेजही पाहिले जाणार असून यामध्ये एखाद्या गाडीची हालचाल संशयास्पद दिसते का, हे पाहिले जाणार आहे.

### तीन ऑगस्टची आपबिती...

त्यादिवशी मी स्वतः गाडीत होतो. पुढे एक आयशर गाडी धावत होती आणि मागून एक चारचाकी गाडी होती. आमच्या गाडीला दाबत होती. मी त्या गाडीचा नंबर मी घेतला होता. त्या गाडीमध्ये चार-पाच जण होते आणि ते हात करत होते. आमच्या गाडीच्या पुढे जायचे, कधी मागे यायचे. डाव्या बाजूने नंतर कट मारून एका गल्लीत घुसले. आयशर ट्रक पुढेही जात नव्हता आणि आम्हालाही जाऊ देत नव्हता. तसेच आमच्या गाडीला सतत दाबण्याचा प्रयत्न केला जात होता. मेटे यांना महत्त्वाची बैठक असल्याने ते म्हणाले जाऊ दे कुणीतरी दारू पिलेले असतील म्हणून त्यांनी दुर्लक्ष केले.

**- अण्णासाहेब मायकर (मेटे यांचे सहकारी)**



### संशयाचे धुके गडद...

अपघात झाल्यानंतर कदम याला सातत्याने माझे एकच म्हणणे होते की, साहेबांशी बोलणे करून दे. साहेबांच्या दोन्ही नंबरवर मी फोन केले, पण ते फोन उचलत नव्हते. माझे त्यांच्याशी बोलणे झाले नाही तर मला वाटत होते किमान सुरक्षारक्षकाशी तरी बोलणे व्हावे, कारण तोपर्यंत मला माहीत नव्हते की सुरक्षारक्षकही जखमी आहे. मात्र एकनाथ हा कोणाशीच बोलणे करून देत नव्हता. तो एकमेव आहे ज्याला हे सगळे कसे झाले हे माहीत आहे. मग साहेबांचा मृत्यू झाला आहे हे त्याला माहीत होते का? किंवा नसेल झाला तर त्याने वैद्यकीय मदत मागितली का? असे सगळे मुद्दे अनुत्तरित आहेत.

**- डॉ. ज्योती मेटे (दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी)**

### असा झाला पाठलाग...

पुढे आयशर आणि मागे चारचाकी असा खेळ तब्बल दोन-अडीच किलोमीटरपर्यंत सुरू होता. चारचाकीमधील लोक हात करून गाडी पुढे थांबवा म्हणून सांगत होते. खुद्द मेटे हे सर्व पाहत होते. त्यामुळे चालकाला गाडी दमाने घे, जाऊ दे त्यांना जायचे असेल तर अशा सूचनाही त्यांनी केल्या होत्या. नेमके हे कार्यकर्ते कोण आहेत आपण पाहू, त्यासाठी गाडी बाजूला थांबवू, असेही मेटे यांना सांगितले होते. पण त्यांनी जाऊ दे म्हटले. रात्रीचा घडलेला प्रकार मी अनेकांना सांगितला होता, असेही मायकर म्हणाले.

### तो ट्रक पालघरमधील

विनायक मेटे यांच्या अपघातास कारणीभूत असलेला ट्रक पालघरमधील असल्याची माहिती समोर आली आहे. विनायक मेटेंच्या फोर्ड एन्डेवेर कारला आयशर कंपनीच्या ट्रकने धडक दिली. डीएन ०९/पी ९४०४ असा या ट्रकचा नंबर असून तो पालघरमधील कासा येथील आहे. विनायक मेटे यांच्या कारला अपघात झाल्यानंतर ट्रकचा चालक ट्रक घेऊन फरार झाला. उमेश यादव असे या ट्रक चालकाचे नाव असल्याचे उघड झाले असून त्याची ओळख पटवण्यासाठी ट्रक मालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

### रोड संमोहनची(रोड हिप्नोसिस) शक्यता

भीषण अपघातांमागे रोड संमोहन हा प्रकार असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मानसिक आणि शारीरिक थकव्यामुळे ड्रायव्हरला वाहतुकीचा वेग नियंत्रणात आणणे किंवा गाडी चालवताना डुलकी लागणे असे प्रकार घडतात. त्यामुळे अशा प्रकारचे अपघात होतात. खासकरून रात्रीच्या वेळी हायवेवर असे प्रकार घडतात. हायवेवर गाडी चालवताना अडीच तासानंतर थोडी विश्रांती हवी व चहा किंवा कॉफी पिणे आवश्यक आहे.चालकाला समोरच्या गाडीचा वेग लक्षात येत नाही.या प्रश्नांवर जनजागृती व्हायला हवी,असे मानसोपचार तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

---

सिद्धेश्वर चिमणी प्रकरण

## डीजीसीएची टीम आज पाहणीसाठी येणार

**सोलापूर** : होटगी रस्त्यावरील श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणीची पहाणी करण्यासाठी केंद्रीय विमान प्राधिकरणाच्या डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हिल एव्हिगेशन (डीजीसीए) ची टीम बुधवारी सोलापुरात येत आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर महापालिकेकडील सुनावणीची तारीख ठरणार आहे.



होटगी रस्त्यावरील श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणी संदर्भात न्यायालयाच्या निर्देशानुसार महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी घ्यावयाची सुनावणी अद्याप स्थगित आहे. आयुक्तांनी सुनावणी 'डीजीसीए' च्या पुढील निर्णयापर्यंत स्थगित केली आहे. दरम्यान, डीजीसीएची ३ सदस्यीय टीम बुधवारी चिमणीची पहाणी करणार आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतरच चिमणी संदर्भात निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही टीम काय अहवाल देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चुलत्याची दशक्रिया विधी करताना पुतण्या बुडाला

**सोलापूर** : चुलत्यांची दशक्रिया विधी करताना पाकणी येथील सीना नदीच्या बंधाऱ्यात बुडालेल्या किशोर दिगंबर व्हटकर (वय ३२ रा.जम्मावस्ती, भवानी पेठ) यांचा मृतदेह तब्बल ३२ तासानंतर मंगळवारी सायंकाळी रेस्क्यूच्या टीमने हुडकून काढला.तालुका पोलिसांच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदना साठी शासकिय रुग्णालयाकडे पाठवून दिला. सोमवारी (१५ऑगस्ट) रोजी सकाळच्या सुमारास किशोर व्हटकर आणि त्यांचे नातेवाईक चुलत्याच्या दशक्रिया विधीसाठी पाकणी येथील बंधाऱ्याजवळ आले होते.



पाण्यात उतरून विधी करीत असताना किशोर यांचा पाय घसरून ते बंधाऱ्यात बुडाले होते. शोधाशोध केल्यानंतर सायंकाळपर्यंत मृतदेह आढळला नाही. त्यानंतर आज सकाळी कोळेगाव (ता. मोहोळ) येथील कोळी समाजाच्या रेस्क्यू टीमने पाण्यात शोध घेतला. सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास मृतदेह आढळून आला.


मयत किशोर व्हटकर हे अविवाहित असून ते शासकीय रुग्णालयात वार्ड बॉय म्हणून काम करीत होते. त्यांच्या पश्चात आई आणि दोन बहिणी असा परिवार आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली. असून हवालदार अनंता चमके पुढील तपास करीत आहेत.

> उतरचे तहसीलदार जयंत पाटील, मोहोळ तहसीलचे रेस्कीयू टिमचे प्रमूख गणेश पवार, तालुका पोलीस ठाण्याचे निरिक्षक नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कोळी बांधव बालाजी भोई,तुकाराम भोई, दिंगबर भोई, दिपक भोई यानी परिश्रम घेऊन मृतदेह शोधून काढला. फौजदार राठोड, हवालदार अनंता चमके, महिंद्रकर पाकणी गावचे तलाठी पावन चव्हाण, कोतवाल दिपक चंदनशिवे, पोलिस पाटील तुकाराम पाटील, शोभा गुंड, बालाजी येलगुंडे, सदस्य शरद चंदनशिवे, पांडुरंग बेलभंडारे, सुनिल शिंदे आदींनी यासाठी सहकार्य केले.

## अंकोलीत शेतकऱ्याची ड्रीप पाईपने आत्महत्या

**मोहोळ** : अज्ञात कारणावरून मोहोळ तालुक्यातील अंकोली येथील ३७ वर्षीय शेतकऱ्याने ड्रिपच्या पाईप ने शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १५ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली.

स्वप्निल डोके हे कुटुंबासमवेत अंकोली (ता. मोहोळ) येथे राहत होते. शेतीबरोबरच ते पिठाची गिरणी चालवून उदरनिर्वाह करत होते. १४ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या दरम्यान जेवण झाल्यानंतर स्वप्निल यांनी कुटुंबातील सदस्यांना पिठाच्या गिरणीत जाऊन तेथून परत शेतात पिकांना पाणी देण्यासाठी जातो असे सांगून घरातून गेले. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ते घरी आले नसल्याने त्यांचे भाऊ सोहन डोके यांनी मोबाईलवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा मोबाईल बंद लागत होता. म्हणून त्यांनी शेतात जाऊन शोध घेतला असता शेतातील झाडाला ड्रीपच्या पाइपने गळफास घेऊन स्वप्निल अशोक डोके यांनी आत्महत्या केल्याचे दिसले.पुढील तपास पोलीस नाईक रवींद्र गोरे करीत आहेत.




## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सलग सुट्ट्या..!

| कल्याण |
| --- |
| 166-39-289 |

| मेन बाजार |
| --- |
| 588-12-589 |

## वडिलाचा खून करून पोलिसात खोटी तक्रार : मुलगा आणि मेहुण्याला अटक व कोठडी

**सोलापूर** : आईला मारहाण करतो म्हणून वडिलाला नारळाच्या झाडास बांधून मारहाण करीत मामाच्या मदतीने खून केला. त्यानंतर वडिलाचा मृत्यू अपघातामध्ये झाला अशी खोटी तक्रार पोलिसात देऊन पुरावा नष्ट करण्याच्या प्रयत्न करणाऱ्या दोघांना मंद्रूपच्या पोलिसांनी अटक केली. त्यांना ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याच्या आदेश न्यायालयाने दिला. ही घटना १३ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास अंत्रोळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे घडली.



शिवाजी बलभीम थोरात (वय ५५ रा. अंत्रोळी) असे खून झालेल्या इसमाचे नाव आहे. त्यांचा मुलगा तानाजी शिवाजी थोरात (वय ३०) आणि तानाजीचा मामा भीमराव रामचंद्र जाधव (वय ४० रा. कंदलगाव ता.दक्षिण सोलापूर) या दोघांना पोलिसांनी अटक करून कोठडी घेतली आहे. मयत शिवाजी थोरात हा मद्य प्राशन करून पत्नी महानंदा हीस नेहमी मारहाण करीत असे. त्याचा राग धरून तानाजी आणि त्याचा मामा भीमराव जाधव या दोघांनी शिवाजी थोरात यांना शनिवारी दुपारच्या सुमारास घरासमोर नारळाच्या झाडास बांधून मारहाण केली. त्यात शिवाजी थोरात मरण पावले. गुन्हा लपवण्यासाठी दोघांनी शिवाजी थोरात यांचा मृत्यू घरासमोर दुचाकीवरून घसरल्याने झाल्याचे पोलिसांना सांगितले. त्यानंतर मृतदेहाची उत्तरीय तपारुणी करण्यात आली. त्यात त्यांचा मृत्यू अपघातात नव्हे तर मारहाणींत झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी चौकशी केली असता, दोघांनी मिळून त्यांचा खून केल्याचे आढळले.

# सरकारची कसोटी

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात होत आहे. सत्तांतर झाल्यानंतर हे पहिलेच अधिवेशन. शिंदे-फडणवीस यांनी महाविकास आघाडीची सत्ता हस्तगत केल्यानंतर गेल्या दोन महिन्यात पुलाखालून पाणी भरपूर वाहून गेले आहे. शपथविधी झाल्या झाल्या दोन मंत्र्यांनी आघाडी सरकारच्या काळात झालेल्या निर्णयांना चाप लावला तसेच हजारो कोटींच्या विकास कामांना स्थगिती दिली.त्यामुळे आघाडीतील नेते चिडणे साहजिकच आहे. निधी थांबवल्याने आपल्या मतदार संघात लोकांना काय तोंड दाखवायचे ही काळजी आघाडीच्या नेत्यांना लागून आहे. हा विचार करता शिंदे-फडणवीस सरकारला विरोधकांच्या हल्ल्याला सामोरे जावे लागणार आहे. विशेषत:, शिवसेनेतील ठाकरे गट जास्त आक्रमक होण्याची चिन्हे आहेत. शिवसेनेत मोठे बंड झाले. शिवसेना फोडण्यात भाजपचाच हात आहे, हे आता लपून राहिलेले नाही. त्यामुळे सेनेचा भाजपवर राग आहे हेही मान्यच करायला हवे. त्यातच शिवसेना नेते संजय राऊत यांच्या मागे ईडी लावून त्यांना तुरुंगात डांबले. हाही राग अधिवेशनात निघेलच. सत्ता कोसळल्यानंतर आघाडीचे अस्तित्व आहे की नाही हे समजायला मार्ग नाही. कारण दोनही काँग्रेसचे नेते व उद्धव ठाकरे हे त्याबाबतीत मौन बाळगून आहेत. ही स्थिती असताना शिवसेनेने विधान परिषदेचे विरोधी



पक्षनेतेपद मिळवले. त्याविषयीचा राग काँग्रेसने यापूर्वीच व्यक्त केला आहे. इतकेच नव्हेतर आघाडीत राहायचे की नाही हे शिवसेनेने स्पष्ट करावे, असे आव्हान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे.त्यामुळे अधिवेशनात भाजप व शिंदे गटाला खिंडीत गाठण्यासाठी तिघांचे स्वतंत्र प्रयत्न होणार की एकत्रित हेही या अधिवेशनात स्पष्ट होईल. शिंदे-फडणवीस सरकारने सत्तेवर येताच आधीच्या ठाकरे सरकारच्या काळातील अनेक निर्णयांना स्थगिती दिली तर, काही निर्णय फिरवले आहेत. त्यात बहुतांश निर्णय हे शिवसेनेशी निगडीत असल्याने शिवसेना जास्त आक्रमक होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेत विरोधी पक्षनेता शिवसेनेचा असल्याने तिथे सत्ताधारी शिवसेना विरुद्ध विरोधक शिवसेना असे चित्र पाहायला मिळेल.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडामुळे शिवसेनेत दोन गट निर्माण झाले आहेत. याच बंडामुळे उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले. त्यामुळे शिवसेनेच्या निशाण्यावर शिंदे गट राहील, अशी शक्यता आहे. एकूणच शिवसेनेच्या मुखपत्रातून प्रामुख्याने शिंदे गटालाच लक्ष्य करण्यात येत आहे. त्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची भूमिका मवाळ आहे. या दोन पक्षांच्या निशाण्यावर प्रामुख्याने भाजपच असेल.विरोधकांच्या आव्हानाबरोबरच विशेष करून शिंदे गटाला अंतर्गत नाराजीशी संघर्ष करावा लागेल,असे दिसते.मंत्रिपदाच्या वाटपावरून शिंदे गटातील काही मंत्री नार-ाज असल्याचे सांगण्यात येते तसेच ज्यांना मंत्रिपदे मिळाली नाहीत,त्यांच्याकडून विरोधकांना रसद पुरवली जाईल ही एक चिंता सत्ताधारी पक्षापुढे असेल.अधिवेशनाच्या पूर्व संध्येला राज्य मंत्रिमंडळाची जी बैठक झाली,तीत राज्यातील महापालिकांच्या निवडणुका २०१७ च्या प्रभाग रचनेनुसार घेण्याचा निर्णय झाला तसेच जिल्हा परिषदांमधील सदस्य संख्या कमी करण्यावरही भर दिला गेला. विरोधकांच्या हाती या दोन विषयांचे कोलीत आयतेच पडले आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचे टेन्शन शिंदे-फडणवीस सरकारपुढे नसले तरी विरोधक त्यातील त्रुटींवर बोट ठेवायला लागतील. तेव्हा सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मोठा संघर्ष होईल.कारण आघाडी सरकारच्या काळातच ओबीसींचा सर्व्हे झाला आहे. पीक विमा आणि कर्जफेडीचे अनुदान यावरही विरोधक हंगामा करतील,असे दिसते. हे सरकार लोकशाहीच्या तत्त्वांची पायमल्ली करून सत्तेवर आले आहे,अशी टीका माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्यामुळे विरोधक किती संतप्त आहेत हे त्यातून स्पष्ट होते. मुंबईमध्ये २५ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनाचे कामकाज प्रत्यक्षात सहा दिवसच चालणार आहे. १९ ऑगस्टला गोपाळकाला असल्याने दोन्ही सभागृहांना सार्वजनिक सुट्टी देण्यात आली आहे. तसेच, शनिवार आणि रविवारीही सुट्टी असल्याने कामकाज होणार नाही. शिवाय, २४ ऑगस्ट रोजी विधिमंडळ कामकाजात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे उर्वरित सहा दिवस राज्यातील पूरस्थिती, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह अन्य प्रश्नांवर सत्ताधारी विरुद्ध विरोधक असा सामना रंगणार आहे. सभापती नार्वेकर हे सभागृह कशारितीने हाताळतात हेही यातून पहायला मिळेल.

## जीवन एक संघर्ष

# हुशार विद्यार्थ्यांचा – पोटासाठी आटापिटा!

राज्यात कौशल्य व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढताना दिसत आहे, मात्र जो अभ्यासक्रम तत्काळ हाताला काम देऊन पैसा उपलब्ध करून देईल, पोटाची भूक क्षमवेल त्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शंभरपैकी शंभर गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनी आयआयटीसारख्या अभ्यासक्रमाची वाट चालण्याची गरज असताना हे विद्यार्थी आयटीआयसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेत आहेत. गुणवत्ता असली तरी जगण्याचे वर्तमानातील प्रश्न वेगळे आहेत हे लक्षात घेऊन विद्यार्थी मार्ग निवडत आहेत. एकीकडे आयटीआयसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला क्षमतेपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर अर्ज आले आहेत. त्याचवेळी शिक्षक होण्यासाठी लागणाऱ्या अध्यापक विद्यालयातील प्रवेशासाठी एकूण क्षमतेच्या ५० टक्केही अर्ज आलेले नाहीत. जे आले आहेत त्यातही गुणवत्तेचा फार मोठा आलेख उंचावला नसणे हे कशाचे द्योतक मानायचे? दुसरीकडे पारंपरिक अभ्यासक्रमासाठी असलेल्या जागाही मोठ्या प्रमाणावर रिक्त राहत आहेत.

सध्या गुणवत्ता असली तरी हाताला काम देणारे अभ्यासक्रम हवे आहेत. ज्ञानाच्या गरजेइतकीच पोटाची भूक महत्त्वाची आहे. ती भूक शिक्षण क्षमवत असेल तर विद्यार्थी तिथेही प्रवेश घेण्यास तयार आहेत. पोटासाठी कष्ट करण्याची हिंमत नवी पिढी दाखवत आहे हे कौतुकास्पद आहे, मात्र ज्ञानवंत विद्यार्थी केवळ नोकरी व पैशांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड करणार असतील तर त्यात समाजाचे व राष्ट्राचेही नुकसान आहे हेही लक्षात घ्यायला हवे. क्षमता असलेली, हुशार, विद्वान, ज्ञानसंपन्न विद्यार्थी हाच आपल्या राष्ट्राचा ठेवा आहे. उद्याची अर्थव्यवस्था ही ज्ञानमय अर्थव्यवस्था असणार आहे. त्यासाठी हुशार विद्यार्थ्यांचा अधिकाधिक उपयोग संबंधित क्षेत्रात होण्याची गरज आहे, मात्र त्याकडे होणारे दुर्लक्ष चिंताजनक म्हणायला हवे.

राज्यात गेल्या काही वर्षांत आयटीआयसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी स्पर्धा उंचावत आहे. त्यासाठीचे प्रवेश ऑनलाईन सुरू करण्यात आले आहेत. येथे असणारी स्पर्धा दिवसेंदिवस वाढत आहे. खरेतर या अभ्यासक्रमाला मिळणारे प्रवेश आणि मिळणारे प्रमाणपत्र म्हणजे हमखास नोकरी असे चित्र शंभर टक्के नाही, मात्र किमान येथे प्रवेश घेऊन कौशल्य प्राप्त केले तर हमखास धंदा तरी करता येईल ही विद्यार्थ्यांमध्ये भावना वाढत आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचेही फारसे समाधानकारक चित्र नाही. तिथेही मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असल्याचे विविध अहवाल सांगत आहेत. त्यामुळे या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. राज्यातील अभियांत्रिकी पदविकेसाठी १ लाख ०२ हजार २२४ प्रवेश क्षमता आहे. त्यापैकी ६९ हजार ७०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पदवीसाठी १ लाख ३७ हजार ५०८ प्रवेश क्षमता आहे, त्यापैकी ८६ हजार ९५२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पदव्युत्तर ५ हजार १५२ जागा असून त्यापैकी ४ हजार ११६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. म्हणजे राज्यात २ लाख ४४ हजार ८८४ प्रवेश क्षमता आहे. त्यापैकी १ लाख ६० हजार ७७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, म्हणजे आपल्याच राज्यातील ८४ हजार ११६ जागा रिक्त आहेत, तर पारंपरिक महाविद्यालयातील कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेकडील ओढा आटलेला आहे.



राज्यात ४ लाख ७३ हजार ९१९ पदवी आणि पदव्युत्तर प्रवेश क्षमता आहे. त्यापैकी २ लाख ७८ हजार ८६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे, म्हणजे कला शाखेतील १ लाख ९५ हजार ०५६ विद्यार्थ्यांच्या जागा रिक्त आहेत. विज्ञान शाखेच्या ३ लाख ३४ हजार २२२ प्रवेश क्षमता असून त्यापैकी २ लाख १५ हजार ८१२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. येथे १ लाख १८ हजार ४१० जागा रिक्त आहेत. वाणिज्य शाखेकरिता ४ लाख ६१ हजार ४१० प्रवेश क्षमता आहे, त्यापैकी ३ लाख ३१ हजार ०२६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या शाखेच्या १ लाख ३० हजार ३८४ जागा रिक्त आहेत. राज्यात बीएडसाठी एकूण २७ हजार ३५२ प्रवेश क्षमता असून त्यापैकी १० हजार ६२१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. कमी अधिक प्रमाणात वास्तुशास्त्र, वैद्यकीय, विधी, कृषीसारख्या विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांची स्थिती आहे. हे अभ्यासक्रम व्यावसायिक असूनही विद्यार्थ्यांचा कल मात्र आयटीआयपेक्षा कमी आहे हे विशेष.

राज्यात आयटीआय व्यावसायिक अभ्यासक्रमाला सुमारे ३ लाख ८ हजार ४३९ विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत. हे अर्ज प्रवेश क्षमतेपेक्षा निश्चित कितीतरी पट अधिक आहेत. यातील ८६.६४ टक्के विद्यार्थी आहेत, तर १३.५७ टक्के विद्यार्थिनी आहेत. ०.००२ टक्के तृतीयपंथीय विद्यार्थी आहेत. यात शंभर टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५३ इतकी आहे. ९६ ते ९९ टक्के गुण मिळविणारे विद्यार्थी २ असून ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ३५३ विद्यार्थी आहेत. ८६ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणारे ३ हजार ५९९ विद्यार्थी असून ८१ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी १२ हजार १४९ इतके आहेत. ७६ टक्क्यांपेक्षा अधिक गुण असलेले विद्यार्थी २३ हजार ६२२ इतके आहेत. ७१ टक्क्यांपेक्षा अधिक गुण असलेले ३३ हजार ४७० विद्यार्थी आहेत. ६६ टक्क्यांपेक्षा अधिक गुण असलेली विद्यार्थी संख्या ४९ हजार ९१६ इतकी आहे. ६१ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ४४ हजार ५६७ विद्यार्थी आहेत. ५६ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४४ हजार ८११ असून ५१ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९२ हजार ७०७ इतकी आहे. ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ११ हजार ९११ इतके आहे. या आकडेवारीवर नजर टाकली तर लक्षात येते की राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओढा आयटीआय अभ्यासक्रमाला आहे. त्यापलीकडे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी ७३ हजार २४८ आहेत. एकूण अर्जांपैकी २४ टक्के विद्यार्थी उच्चश्रेणीतील आहेत हे विशेष. राज्यात दुसरीकडे डीटीएडसारख्या अभ्यासक्रमाला सुमारे ३२ हजार ६४७ विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे, मात्र या जागांसाठी केवळ १५ अर्ज प्राप्त झाले आहेत.

उद्याचा भारत ज्यांनी घडवायचा आहे तिथे कमी गुणवत्तेचे विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. त्यामुळे उद्याच्या काळात शिक्षणाची प्रक्रिया तरी गुणवत्तापूर्ण कशी होईल, हाही प्रश्न आहे. त्यात आपण ज्यांना हुशार म्हणतो अशी मुले परिस्थितीअभावी व्यावसायिक कौशल्याच्या क्षेत्रात येत असतील तर ती गोष्ट निश्चितच त्या क्षेत्रासाठी चांगली असली तरी भविष्यातील ज्या बौद्धिक गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची गरज भासणार आहे त्या क्षेत्रात मोठी उणीव निर्माण होण्याची शक्यता अधिक आहे.

**- संदीप वाक्चौरे.**

## टुडेज ब्लॉग

# पीडित पुरुष!

**समाज फक्त स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक छळाकडे वेगळ्या नजरेने बघतो, परंतु स्त्रियांप्रमाणे या सर्व प्रकरणात तितकेच पुरुष पती म्हणून अथवा नवऱ्याचा भाऊ, नणंदेचा नवरा म्हणून खोट्या गुन्ह्यात गुंतवले आणि भरडले जातात. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४नुसार कायद्यासमोर स्त्री-पुरुष समान असून सर्वांना समान संरक्षण दिले जाईल, असे म्हटले आहे. स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये लिंगभेद करता येणार नाही, असे घटनेत नमूद असताना कायदा मंडळाने स्त्रिया, बालके व दुर्बल घटकांसाठी विशेष तरतुदी करून त्यांना जास्त अधिकार दिले आहेत.**

खरंतर सामाजिक परिस्थिती पाहता महिलांना जास्त अधिकार देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे असले तरी अधिकारांचा वापर होऊन गैरवापर थांबला पाहिजे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. महिला अत्याचाराच्या बाबतीत सरकारने कडक तरतुदी केल्यामुळे त्याचा फायदा महिलांना होतच आहे. परंतु याच कायद्याचा गैरवापर कौटुंबिक वादामध्ये, प्रेम संबंधांमध्ये बदला घेण्यासाठी तितक्याच मोठ्या प्रमाणात होताना समाजात दिसत आहे. कायद्याचा उपयोग चांगल्या आणि वाईट कामासाठी होतो. अशाप्रकारे कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी कठोर दंडात्मक कारवाई केली पाहिजे आणि न्यायाचा समतोल राखण्यासाठी कायदे मंडळाने प्रयत्न करणे गरजेचे आहे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

खरंतर काळानुसार परिस्थिती बदलत चालली. पुरुषप्रधान संस्कृती स्त्रीप्रधान बनत चालली. कष्ट करून कमावलेला पैसा घरात महिलांच्या तिजोरीत ठेवला जाऊ लागला आहे. आता पुरुषांप्रमाणे महिलाही नोकरी करू लागल्या आहेत. पूर्वीच्या हाऊसवाईफची जागा घर सांभाळणाऱ्या हाउस हजबंड म्हणजे घर सांभाळणाऱ्या नवऱ्याने घेतली. त्याची परिणती आज वास्तवात अनेक नवऱ्यांना बायकोच्या मर्जीवर घरखर्चासाठी हात पसरून जगावे लागत आहे. पुरुषाची कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्याची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे, याच तत्त्वात गुंतलेल्या पीडित पुरुषांसाठी खावटीसाठी कायद्यात कोठे तरतूद आहे? असे अत्याचार सहन करणारे हजारो पुरुषसुद्धा आहेत.



सर्वोच्च न्यायालयाने एका निकालपत्रामध्ये कौटुंबिक कलहाच्या गुन्ह्यात नवऱ्याच्या दूरच्या नातेवाईकांना विशिष्ट सहभागाशिवाय गुंतवणे म्हणजेच कायद्याचा गैरवापर होत असल्याचे म्हटले आहे. अरनेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या खटल्यातसुद्धा सुप्रीम कोर्टाने ४९८अमध्ये आरोपींना अटक करण्याच्या अधिकाराबाबत पोलिसांना मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. तरीही त्याचा गैरवापर थांबलेला दिसत नाही. तसेच अनेक वेळा प्रेमाचे रूपांतर बलात्काराच्या व विनयभंगाच्या खटल्यांमध्ये केले जाऊन अनेक निरपराध पुरुषांना अनेक दिवस जेलमध्ये डांबले जाते. त्या माध्यमातून संबंधित आरोप झालेल्या व्यक्तींचे सामाजिक स्थान, प्रतिष्ठा धोक्यात येते. बदनामी व सामाजिक रोषाला निष्कारण सामोरे जावे लागते.

खरंतर महिला अत्याचारासंबंधी आवाज उठवणाऱ्या अनेक संघटना, महिला आयोग कार्यरत आहेत, परंतु पुरुषावर होणाऱ्या अत्याचाराबाबत आवाज उठणारे कोणीही दिसत नाही. सरकारलाही इतक्या मोठ्या पुरुषवर्गाला न्याय देण्यासाठी एखादा पुरुष हक्क आयोग स्थापन करावा असे वाटताना सध्यातरी दिसत नाही. महिला अत्याचाराच्या खटल्यांमध्ये न्यायाधीश फिर्यादी पक्षाला गुन्हा शाबीत करता आला नाही म्हणून आरोपींना संशयाचा फायदा देऊन निर्दोष सोडतात, परंतु चार भिंतींच्या आत घडणाऱ्या गुन्ह्यातील अंतिम सत्य शोधण्यासाठी ना कोर्टाकडे यंत्रणा आहे, ना सरकारकडे. त्यामुळे खोट्या केसेस करणाऱ्याचे फावते. त्यामुळेच सामान्य माणूस खरंतर त्यामध्ये भरडला जातो. त्यामुळेच आजची न्यायप्रणाली ही समानतेच्या राज्यात पुरुषांना समान न्याय देण्यात अपयशी ठरते. प्रत्येक कायदा सरकारने चांगल्या उद्देशाने निर्माण केलेला असतो. त्याचा वापर करणे समाजाच्या दृष्टीने गरजेचे असले तरी गैरवापर थांबून पुरुषांना न्याय दिला पाहिजे. पुरुष व त्याच्या नातेवाईकांची पिळवणूक थांबली पाहिजे. खोट्या तक्रारी करणाऱ्यांना वेसन घालण्यासाठी कायद्यात कठोर तरतुदी करणे गरजेचे आहे. तोपर्यंत पीडित पुरुषांना न्याय मिळणे अशक्य आहे इतकेच.

**-ॲड. गोरक्ष कापकर.**

## बोधकथा

# मूर्ख डोमकावळा

एका गरूडाने कुरणात चरत असलेल्या मेंढ्यांच्या कळपातील एका कोकरावर झडप घातली व त्या कोकराला पळवून नेले. त्याचे हे धाडस आणि सामर्थ्य पाहून रानातले सर्व पशुपक्षी त्या गरूडाकडे भीतीयुक्त आदराने पाहू लागले. गरूडाने पळवले त्यापेक्षाही मोठे कोकरू जर आपण पळवले तर गरूडापेक्षाही आपला मानसन्मान वाढेल, त्याच्याइतकीच प्रतिष्ठा आपल्याला लाभेल असे एका डोमकावळ्याला वाटले.



त्यासाठी त्याने नजर ठेवून एका मोठ्या थोराड अशा कोकराच्या पाठीवर बसून त्याला उचलण्याचा प्रयत्न केला. पण ते कोकरू उचलले जाण्याऐवजी, डोमकावळ्याचेच पाय कोकराच्या पाठीवरील लोकरीमध्ये अडकले व तिथून सुटण्यासाठी त्याने पंखांची केलेली फडफड व आरडाओरड मेंढपाळाच्या कानी गेली. तो तिथे आला व त्याने डोमकावळ्याला सोडविले व पिंजऱ्यात कैद केले व त्याला स्वत:च्या मुलांच्या स्वाधीन केले. मुलांनी मेंढपाळाला विचारले, 'बाबा या पक्ष्याचे नाव काय हो? यावर तो मेंढपाळ हसून म्हणाला, या मूर्ख पक्ष्याला जर तुम्ही याचे नाव विचारले तर हा स्वत:ला गरूडापेक्षाही श्रेष्ठ असा पक्षी म्हणून स्वत:ची ओळख करून देईल पण प्रत्यक्षात हा मोठेपणाचा आव आणणारा एक भिकार डोमकावळा आहे.

**तात्पर्य: काही काही लोकांना मोठेपणाचा आव आणण्याची प्रचंड सवय असते. यामध्ये त्यांनी कितीही जरी मोठेपणाचे सोंग घेतले तरी इतर सूज्ञ लोक हे त्यांची पात्रता जाणून असतात.**

## जन्म हा अखेरचा

# आशीर्वचन आठवे



एवढे ज्ञान झाले की मनुष्य कुठल्याही वस्तूवर आसक्त होत नाही तो सहज वर्तणूक करू लागतो. साखरेच्या मूर्तीसाठी मुले भांडण करतात, कुणी म्हणतो मला घोडा हवा, कुणी म्हणतो मला माकड हवे तर कुणी म्हणतो मला माणूस हवा. त्यांचे भांडण पाहून मोठी माणसे मनाशी हसतात. कारण त्यांना माहीत असते की मूर्ती वेगळ्या असल्या तरी त्या साखरेच्याच आहेत. मुलांचे भांडण निरर्थक आहे. त्याप्रमाणे अज्ञानी माणसांच्या दृष्टीला प्रपंचात भेद दिसतो, परंतु ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीला मात्र विश्व शिव-शक्तीचे स्वरूप आहे असा साक्षात्कार होत असतो. म्हणून तो जगताला परमात्मस्वरूपच मानतो.

तिसरी गोष्ट आहे 'मायासंबंधराहित्य।' मायेच्या संबंधापासून जो दूर आहे असा जीवात्मा शरीरात राहत असला तरी तो 'अकाय' आहे. अर्थात कायेच्या स्वभावाचा, तिच्या गुणांचा त्याच्यावर थोडादेखील प्रभाव नसतो. मायेसंबंधी शास्त्रात खूप वर्णन केलेले आहे. तिची रूपे अनेक आहेत. कोणत्या रूपाने, कोणत्या प्रकारे मनुष्याला मोहात पाडील ते सांगता येत नाही. ती कोणत्या ना कोणत्या रूपात मनुष्यासमोर उभी राहते आणि त्याच्यावर आपली अधिसत्ता गाजवते. शिवभक्त रावण शिवाचे आत्मलिंग प्राप्त व्हावे म्हणून कठोर तपश्चर्या करीत होता. तेंव्हा भगवान विष्णूंनी आपली मायाशक्ती त्याच्या ठिकाणी संचरवली. त्यावेळी प्रसन्न झालेल्या शंकराला रावणाने आत्मलिंग न मागता पार्वती मागितली. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**

## जनमानस

# भारतीय खेळाडूंकडून पदकांच्या अपेक्षा वाढल्या



नुकत्याच पार पडलेल्या २२व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये ६१ पदके मिळवून भारतीय खेळाडूंनी सांघिक पदक तालिकेत चौथे स्थान प्राप्त केले. बाराही कुस्तीपटूंनी पदके जिंकली तर बॉक्सिंग संघाने चांगलीच पदके पटकावली. मागील ऑलिम्पिक स्पर्धा आणि राष्ट्रकुल स्पर्धेत समाधानकारक कामगिरी केल्यामुळे भारतीय खेळाडूंकडून पदकांची विशेष अपेक्षा होती. त्याला साजेल अशीच जिवापाड मेहनत करून अंगी बाळगलेली गुणवत्ता आणि कौशल्य पणास लावले. आपल्या पहिल्याच राष्ट्रकुल स्पर्धेत खेळणाऱ्या लक्ष्य सेनने खणखणीत विजय मिळवीत सुवर्ण पदक पटकावले.

महाराष्ट्राच्या अविनाश साबळेने स्टिपलचेस या अडथळ्यांच्या शर्यतीत रौप्य पदक पटकावताना केनियन खेळाडूंना चांगलीच टक्कर दिली. ॲथलेटिक्स, लांब उडी, तिहेरी उडी, चालण्याच्या स्पर्धेत पदके मिळवणाऱ्या सर्वच खेळाडूंनी पदक मिळविण्याच्या जिद्दीने आपला सर्वोत्तम खेळ केला आणि लौकिकाला साजेशी पदकांची कमाई केली. देश विदेशात प्रशिक्षण, सरावात सातत्य ठेवताना पदक मिळविण्याच्या ईर्षेने देशाचा गौरव वाढवला त्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन. या खेळाडूंनी संपादन केलेले यश पाहता आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळविल्या जाणाऱ्या स्पर्धांमध्ये तसेच पुढील ऑलिम्पिकमध्ये त्या प्रत्येकाकडून उच्च कामगिरीची अपेक्षा होणार आहे. त्यावेळी आपली जिद्द, आत्मविश्वास, गुणवत्ता कामी आणत पदकांची लयलूट करतील, असा विश्वास बाळगायला हरकत नाही.

**- प्रा. स्नेहा राज.**

# बायकॉटमुळेच लाल सिंह चड्ढा फ्लॉप?

**२०१८ मध्ये आमिर खानचा ठग्ज ऑफ हिंदुस्तान प्रदर्शित झाला होता. भव्य बजेटच्या या चित्रपटात इंग्रजांविरुद्धची लढाई दाखवण्यात आली होती. अमिताभ बच्चन यांचीही या चित्रपटात महत्त्वाची भूमिका होती. चित्रपटाचे प्रचंड प्रमोशन करण्यात आले होते. पण प्रदर्शित झाल्यानंतर हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. तेंव्हा या चित्रपटाला कोणीही बायकॉट केले नव्हते. तरीही हा चित्रपट फ्लॉप झाला होता. याचे कारण होते चित्रपटाचे कथानक आणि सादरीकरण. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर माउथ पब्लिसिटीमुळे जो प्रेक्षक चित्रपट पाहायला जाण्याचे ठरवत होता तोसुद्धा गेला नाही आणि निर्माते यशराज फिल्म्सला मोठे नुकसान सहन करावे लागले.**

जवळपास चार वर्षानंतर आमिर खान लाल सिंह चड्ढा घेऊन आला. हॉलिवूडचा सुपरहिट चित्रपट 'फॉरेस्ट गम्पचा' हा चित्रपट अधिकृत हिंदी रिमेक आहे. प्रख्यात अभिनेता अतुल कुलकर्णीने याचे हिंदी रूपांतर केले होते. आमिरने या चित्रपटाच्या रिमेकचे अधिकार मिळवण्यासाठी खूप प्रयत्न केले. जवळ जवळ आठ वर्ष त्याचे प्रयत्न सुरू होते, असे म्हटले जाते. ठग्ज ऑफ हिंदुस्तान प्रदर्शित झाल्यानंतर आमिरने लाल सिंह चड्ढाच्या शूटिंगला सुरुवात केली होती. खरं तर २०20 मध्येच हा चित्रपट प्रदर्शित केला जाणार होता. पण कोरोनामुळे चित्रपटाचे प्रदर्शन लांबले आणि तो आता प्रदर्शित झाला. आमिरचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर उत्पन्नाचे विक्रम करेल असे म्हटले जात होते. त्यातच आमिरची आणि त्याची पूर्वाश्रमीची पत्नी किरण राव यांचे वक्तव्य, करीना कपूरने प्रेक्षकांबाबत केलेले वक्तव्य यामुळे देशभरात सोशल मीडियावर लाल सिंह चड्ढा बॉयकॉट करण्याची मोहीम सुरू झाली आणि चित्रपट प्रदर्शित होताच फ्लॉप ठरला.





पण खरंच सोशल मीडियावर चित्रपटाला बायकॉट केल्याने चित्रपट फ्लॉप झाला का? तर याचे उत्तर माझ्या मते तर नाही असेच आहे. याचे कारण म्हणजे, भारतीय प्रेक्षक हा खूप हुशार आहे. चित्रपटाचे केवळ पोस्टर पाहून तो चित्रपट कसा असेल याचा अंदाज घेतो आणि विशेष म्हणजे बहुतेक वेळा त्यांचा अंदाज हा खरा ठरतो. लाल सिंह चड्ढाची गोष्ट प्रेक्षकांना अगोदरच ठाऊक झाली होती. त्यामुळे चित्रपटाबाबत एक प्रकारची नकारात्मकता अगोदरच तयार झाली होती आणि त्याचा फटका चित्रपटाला बसला असे माझे स्पष्ट मत आहे. यात बायकॉट काहीही संबंध नाही. चित्रपट जरी बॉयकॉट केला तरी आमिरच्या प्रशंसकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. तो नेहमी काहीतरी वेगळा करतो असा त्यांना ठाम विश्वास आहे आणि म्हणूनच ते आमिरचे चित्रपट पाहतातच. सोशल मीडियावरील बायकॉटच्या मोहिमेनंतर आमिरने प्रेक्षकांना बायकॉट करू नका असे आवाहन केले होते. बायकॉटची मोहीम ही त्याच्या प्रचाराचाच एक भाग होती असेही बॉलिवूडमध्ये म्हटले जात आहे. 'बॅड पब्लिसिटी ऑल्वेज गेन मूव्ही' असे म्हटले जाते. पैसे खर्च न करता संपूर्ण देशभरात फुकटची पब्लिसिटी होते आणि चित्रपटात काय आहे हे पाहायला प्रेक्षक येतातच असा बॉलिवूड निर्मात्यांना विश्वास आहे. मात्र प्रत्येक वेळेला हे खरे ठरतेच असे नाही.

बायकॉट मोहिमेमुळे चित्रपट फ्लॉप होतोच असे नाही. चित्रपटात दम असेल तर तो सर्व संकटांवर मात करीत यशाच्या घोड्यावर स्वार होतो. लाल सिंह चड्ढाला मोठा वीकेंड मिळून, ४ हजारपेक्षा जास्त चित्रपटगृहात शेकडो शो लावूनही, तिकिट दर २००च्या वर असूनही १८० कोटींमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने आतापर्यंत फक्त ४० कोटींचाच व्यवसाय केला आहे. आमिरचा हा आतापर्यंतचा कलेक्शनच्या बाबतीत अत्यंत सुमार चित्रपट म्हटले तर वावगे ठरणार नाही आणि यामागे केवळ बायकॉट हे कारण नाही तर चित्रपटाचा सुमार दर्जा, आमिरच्या अभिनयातील तोच तोचपणा हे आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही. स्वतः आमिरनेही एका मुलाखतीत म्हटले होते की, सोशल मीडियावर काय चालू आहे त्याची मला माहिती नाही. त्यामुळे बायकॉटमुळे चित्रपट फ्लॉप झाला असे म्हणणे चूक आहे हे सगळ्यांनी लक्षात घ्यायला हवे.

**- चंद्रकांत शिंदे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## निर्वासितांचा आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते सत्कार

**सुराज्य/अकलूज** : १५ ऑगस्ट १९४७ साली भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले त्याच्या आदल्या १४ ऑगस्ट या दिवशी इंग्रजांनी भारत देशाची फाळणी करून अखंड भारताचे एक अंग बाजूला करून पाकिस्तान हा देश निर्माण केला. त्या काळात पाकिस्तानात रहात असणारे कित्येक हिंदू कुटुंब आपले सर्वस्व, घरदार, पूर्ण प्रॉपर्टी सोडून स्वातंत्र्य भारतात परत आले. त्या काळात त्यांना निर्वासित असे संबोधले जात होते. त्यांचा आज स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने शिवरत्न बंगला शंकरनगर-अकलूज येथे आ. रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते व सोलापूर जिल्हा संघटन महामंत्री धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत प्रेमसागर मेंगाराम पुंज, सीता सुरेंद्र पुंज शोभा यशवंत ब्रह्मी या ज्येष्ठांचा शाल, हार, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी भाजप अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाध्यक्ष मुक्तार कोरबू, सोलापूर जिल्हा ओबीसी मोर्चा माजी अध्यक्ष बाळासाहेब वावरे भाजप माळशिरस सांस्कृतिक सेल उपाध्यक्ष अमित पुंजहहितेश पुंज, विक्रम पुंज, कल्पना शर्मा, मोनिका शर्मा इत्यादी उपस्थित होते.

## इतिहासकार विश्वासराव पाटील यांचे आज व्याख्यान

**सुराज्य/मोहोळ** : श्रीकृष्ण गुरुकुल वाघोलीवाडी (ता. मोहोळ) या संस्थेचा दुसरा वर्धापन दिन १७ ऑगस्ट रोजी संपन्न होत असून त्यानिमित्त प्रसिध्द इतिहासकार विश्वासराव पाटील याच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रमोद अवताडे यांनी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, शहरी विद्यार्थ्यांबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी टिकले पाहिजे यासाठी या श्रीकृष्ण गुरुकुल या संस्थेची स्थापना करण्यात आली या संस्थेचा दुसरा वर्धापन दिन १७ ऑगस्ट रोजी संपन्न होत आहे त्यानिमित्त प्रसिध्द इतिहासकार विश्वासराव पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन बुधवारी दुपारी साडेबारा वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, माजी जिल्हाधिकारी गोकूळ मवारे, जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी दिलीप स्वामी, शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, डी. वाय. पी. तहसीलदार प्रशांत बेंडसे आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव नवनाथ बावचे व खजिनदार स्वाती निकम यांनी केले आहे.

## साळमुखवाडी परिसरात बिबट्या सदृश प्राण्याचा धुमाकूळ

**सुराज्य/पिलीव** : माळशिरस तालुक्यातील साळमुखवाडी परिसरात बिबट्या सदृश प्राणी गेल्या दोन दिवसापासून नागरिकांना दिसत असल्यामुळे नागरिकांमध्ये सध्या घबराटीचे वातावरण पसरले आहे. तो प्राणी सध्या जनावरे, शेळयांवर हल्ला करीत आहे. या प्राण्याने संजय मदने यांच्या शेळीवर हल्ला करीत शेळी मारुन टाकली तसेच कुत्र्यावरही हल्ला केला तर त्याच भागातील जाधव यांच्या कालवडीवर हल्ला करीत मृत्यू मुखी केले. सध्या यामुळे या भागात नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. यामुळे नागरिक रात्र जागून काढीत आहेत. याठिकाणी वनविभागाचे अधिकारी लडकत व संजय जगदाळे यांनी संजय मदने यांच्या घरी जाऊन मृत झालेल्या शेळीची पाहणी केली तसेच या प्राण्याचे माग सुध्दा पाहिले असून सदरचा प्राणी हा तरस असल्याचे सांगितले. नागरिकांनी काळजी घ्यावी लवकरच सदरचा तरस आम्ही जेरबंद करु असे सांगितले.

## रेल्वे लाईन परिसरात वृध्द इसमाची गळफास घेऊन आत्महत्या


**सुराज्य/सोलापूर**: रेल्वे लाईन परिसरातील गौरीशंकर सोसायटीत राहणाऱ्या अशोक कृष्णाजी करंदीकर (वय ७६) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. काल सोमवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घराच्या गच्चीवरील छताला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे. या मागचे कारण समजले नाही.

# श्री पांडुरंग कारखान्यास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचा देशपातळीवरील प्रथम पुरस्कार

**सुराज्य/श्रीपूर**

श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने महाराष्ट्रात पहिल्यांदा को-जनरेशन प्लॅट. उभारुन सहकारी साखर कारखान्यामध्ये आदर्श निर्माण केला आहे. को-जनरेशनमध्ये केलेल्या सर्वोच्च कामगिरीचा विचार करुन सन - २०२१-२२ या वर्षाकरीता को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेने ६७ के. जी. बॉयलरच्या आतील को-जनरेशनसाठी देशपातळीवरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण दि. २७ ऑगस्ट रोजी मुंबई येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच खा. शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

यावेळी बोलताना प्रशांतराव परिचारक यांनी माहिती दिली की, को-जनरेशन असोशिएशन ऑफ इंडिया यांनी हंगाम २०१८-१९ ते २०२०-२१ या तीन वर्षाच्या कालावधीत केलेल्या कामगिरीच्या आधारावर ६७ ज्ञस च्या आतील बॉयलर असणाऱ्या को-जनरेशन प्रकल्पास देशपातळीवरील प्रथम क्रमांकाचा सर्वोकृष्ट पुरस्कार दिला आहे. त्यामध्ये श्री पांडुरंग कारखान्याने कमीत कमी बगॅसमध्ये जास्तीत जास्त वीज निर्मीती, अंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेले कार्बन क्रेडीट, कमी उत्पादन खर्च, कारखान्यास मिळालेले सर्टीफिकेट व कारखान्याच्या असलेल्या सुरक्षा योजना, कारखान्याचा सौर ऊर्जा प्रकल्प, कमीत कमी पाणी वापर, पाण्याचा पुर्णवापर, पाचटाचा



वापर करून वीज निर्मीती, को- जनरेशन प्लँटची क्षमता वापर या सर्व बाबींचा विचार करुन पुरस्कार जाहिर करणेत आला आहे. सदरचा पुरस्कार स्विकारण्यासाठी कारखान्याचे पदाधिकारी व अधिकारी जाणार आहेत.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिली की, श्री पांडुरंग कारखान्याचा ज्यावेळी को-जन प्लँट उभा केला त्यावेळी महाराष्ट्रात को-जनरेशन प्लँटचे प्रमाण कमी होते परंतू श्रध्देय सुधाकरपंत परिचारक (माठे मालक) यांच्या आशिर्वादाने व कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक व संचालक मंडळाचे सहकार्याने कारखान्याचा को-जन प्लँट यशस्वी चालुन त्यामधुन जास्तीत जास्त वीज निर्मीती करुन कारखान्यास आर्थीक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण केला आहे. कारखान्याने को-जनरेशनमध्ये केलेल्या सर्वोच्च कामगिरीमुळेच कारखान्यास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेकडून देशपातळीवरील सर्वोच्च को-जन प्लँट म्हणुन गौरविणेत येणार आहे. यापुढे कारखाना केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर यशाची अनेक शिखरे सर करेल असे सांगीतले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे व संचालक यांनी कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी, कामगार यांचे अभिनंदन करुन पुढील कामास शुभेच्छा दिल्या.

को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया हि संस्था को-जन प्लँट मध्ये काम करीत असून या हंगामापासून ६७ घ्रू च्या आतील बॉयलर क्षमता असलेले को-जनरेशन प्लँट व ६७ घ्रू च्या जास्त बॉयलर क्षमता असेलेले को-जनरेशन प्लँट यांची विगतवारी करुन त्यांना देशपातळीवरिल बेस्ट को-जन प्लँट व बेस्ट के-जन मॅनेजर असे प्रत्येकी दोन पुरस्कार जाहिर केले आहेत.

### विभुते यांना बेस्ट को-जन मॅनेजर पुरस्कार जाहीर



श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे को-जनरेशन मॅनेजर सचिन विभुते यांना को-जन असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेचा सन - २०२१-२२ या वर्षातील देशपातळीवरील बेस्ट को-जन मॅनेजर म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. सचिन विभुते हे पांडुरंग सहकारी साखर कारखान्यामध्ये मागील १८ वर्षापासून काम करीत असून त्यांनी केलेल्या कामगिरीच्या व त्यांनी दाखविलेल्या कौशल्याच्या जोरावर हा पुरस्कार प्राप्त झाला असून कारखान्यामध्ये उभारलेल्या को-जनरेशन प्रकल्पाच्या सुरुवातीपासुनच त्यांनी अत्यंत उत्कृष्ट काम केले आहे. को-जनरेशनमध्ये काम करीत असताना जास्तीत जास्त विज निर्मीती करुन जास्तीचे विज युनिट निर्यात करण्यावर त्यांनी भर दिला आहे. याचीच दखल को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया यांनी घेवून त्यांना देशपातळीवरील सर्वोत्कृष्ट को-जन मॅनेजर या देशपातळीवरील पुरस्काराने सन्मानीत करणेत येणार आहे.

## रस्त्यावरील खड्डे दुरुस्त करण्याची मागणी

### मोहोळ नगर परिषदेसमोर आंदोलन

**सुराज्य/मोहोळ**

मोहोळ शहरातील मेन रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून ते तात्काळ दुरुस्त करावेत या मागणी साठी मोहोळ नगर परिषदेसमोर पडलेल्या खड्ड्यां समोरच क्रांतीवीर भगतसिंग युवा प्रतिष्ठान च्या वतीने दशरथ काळे यांच्या नेतृत्वा खाली ठिय्या आंदोलन करण्यात आले.

मोहोळ शहरात नगर परिषद स्थापन झाल्यापासून मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला भरपूर विकास कामे या पाच वर्षात झाली यातील बरीच कामे निकृष्ठ झालेली आहेत. मोहोळ शहरातील छ. शिवाजी महाराज चौक ते आठवडा बाजार या मेन रोडवरही मोठमोठे खड्डे पडले आहेत त्यामुळे रस्त्यावर पडलेल्या खडडयात पावसाचे पाणी साठते यामुळे पायी चालत जाणाऱ्या शाळकरी मुल महीला वृध्द नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे मुख्य रस्ता तात्काळ दुरुस्त करावा या मागणी साठी १५ ऑगस्ट स्वातंत्व्रय दिनी मोहोळ नगर परिषदेसमोर असलेल्या खड्ड्या समोर ठिय्या आंदोलन करण्यात आले या आंदोलनात क्रांतीवीर भगतसिंग युवा प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष दशरथ काळे डॉ पृथ्वीराज काळे बाळासाहेब क्षिरसागर बापूसाहेब आठवले संगम बळवंतराव आकाश राऊत रोहिदास पवार महेश वाघमोडे करण साळूंके श्रीशैल निस्ताने अविनाश क्षिरसागर आदी सहभागी झाले होते या आंदोलनास कॉग्रेसचे तालुका अध्यक्ष सुरेश शिवपुजे किशोर पवार सुरेश हावळे शिवसेनेचे बाळासाहेब वाघमोडे भीम युवा प्रतिष्ठानचे ॲड. विनोद काबळे यांनी पाठींबा दिला.



## मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी अमोल शिंदे

**सुराज्य/सोलापूर**

सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्षपदी अमोल शिंदे यांची तर कार्याध्यक्ष पदी शिवराज झुंजे यांची निवड झाल्याचे विश्वस्त सचिव संजय शिंदे यांनी रविवारच्या विशेष कार्यकारणी बैठकीत जाहीर केले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष द्वारकाप्रसाद तावनीया होते.

अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणेः उपाध्यक्ष लतातार्इ फुटाणे, शिवानंद सावळगी, मल्लिनाथ सोलापुरे, लक्ष्मीकांत मिरजकर, चक्रपाणी गज्जम.

कार्यवाह -आकाश हारकुड

सहकार्यवाह- बसवराज हिंगमिरे कोषाध्यक्ष- सोमा शरणार्थी, सहकार्यालयप्रमुख- दिलीप पाटील, वैभव विभुते. प्रसिध्दीप्रमुख - वीरेश सक्करगी

सांस्कृतिक विभाग प्रमुख -विश्वनाथ गोयल, रवींद्र आमने, अनिकेत फताटे, प्रवीण कोणापुरे, मल्लेश पुरवंत, मिरवणूक प्रमुख -भारत गोटे, अनिल शहापूरकर, संतोष खंडेराव, शरद गुमटे, अशितोष पूरवंत, अरुण आकुडे. विशेष महिला प्रतिनिधी -श्रीमती सुमन मुदलियार, हेमा चिंचोळकर, मंगला जोशी, पद्मजा टोळळे प्रमुख सल्लागार- द्वारकाप्रसाद तावनीया हिशोब तपासणीस-जी. जी. बोरगांवकर.

यांची निवड झाली. या बैठकीस विश्वस्त अध्यक्ष नरसिंग मेंगजी, विश्वस्त सुनिल रसाळे, दास शेळके, दिलीप भाऊ कोल्हे, संजय शिंदे, कैलास मेंगाणे, बसवराज येरटे, विजय पुकाळे, गौरव जक्कापुरे, रसूल पठाण, अनिल गवळी, भाऊसाहेब रोडगे, बाबा शेख आणि पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पुकाळे यांनी केले तर आभार संजय शिंदे यांनी मांडले

### यंदाचा गणेशोत्सव उत्साहात साजरा करू

यंदाच्या वर्षीचा अध्यक्षपदी निवड केल्याने आभार मानत अमोल शिंदे यांनी यंदाचा गणेशोत्सव हा मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरा होणार असून विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व त्याचबरोबर आरास स्पर्धेचा आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

## संभाजीराव शिंदे विद्यामंदिरात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**सुराज्य/सोलापूर**

विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे विद्यामंदिरात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमा एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पो. नि. राजन माने, संस्थेचे सचिव महेश कोठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

इ. १० वी व इ. १२ वी बोर्ड परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या प्रथम तीन क्रमांकांच्या विद्यार्थ्यांना संस्थेकडून रोख रक्कम बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

संस्थेचे आधारस्तंभ स्व. विष्णुपंत कोठे यांच्या ८५ व्या जयंतीनिमित्त आंतरशालेय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा, जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा,




सूर्यनमस्कार, माता पालक रंगभरण, प्रथम तीन क्रमांक येणाऱ्या सर्व स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नगरसेवक देवेंद्र कोठे, डॉ. राधिकाताई चिलका, विष्णुराज देवेंद्र कोठे, प्राचार्य वासुदेव इप्पलपल्ली, प्राथ. मुख्याध्यापिका मारपल्ली मॅडम, पर्यवेक्षक सतीश मल्लाव, ज्युनिअर विभाग प्रमुख व्हटकर, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, सर्व विभागातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.


## निधनवृत्त

### चतुराबाई जाधव



**सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची येथील रहिवासी चतुराबाई विठ्ठल जाधव (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या गुळवंची ग्रामपंचायत सदस्य सुनिल जाधव, मार्डी बृहत सोसायटी सचिव ज्ञानेश्वर जाधव यांच्या मातोश्री होत.

### लालचंद महादेव माळी



**सुराज्य/दक्षिण सोलापूर** : हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचे मराठी विषयाचे शिक्षक प्राध्यापक लालचंद महादेव माळी यांचे आज मंगळवार दिनांक १६ ऑगस्ट रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार दर्गनहळळी जन्मगावी बुधवारी सकाळी दहा वाजता होईल. त्यांच्या मागे आई, पत्नी, मुले असा परिवार आहे.

### विनायक क्षिरसागर



**सुराज्य/तुळजापूर** : येथील हॉटेल माऊलीचे मालक विनायक (तात्या) हरिचंद्र क्षिरसागर (वय ६२) यांचे शनिवार, दि. १३ ऑगस्ट रोजी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## अंत्रोळी येथे झाडाला बांधून एकाचा खून

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंत्रोळी येथे नारळाच्या झाडाला बांधून एकाचा खून केल्याची घटना रविवारी घडली या घटनेने अंत्रोळी परिसरात खळबळ माजली आहे.

अंत्रोळी जामगांव रोडवर गाडीवरून पडून जखमी झाल्याची खबर मयताचा मुलगा तानाजी शिवाजी थोरात ( रा. अंत्रोळी) यांनी मंद्रूप पोलिसात अपघाती मृत्यूची खबर दिली होती. त्या नुसार मंद्रूप पोलिसठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अमितकुमार करपे हे घटनेचा तपास करीत असताना सदरची घटनाही गाडीवरूनपडून झाली नसून घात पात असल्याचे समोर आल्याने संशयिताना तब्यात घेतले. बहिणीला कुऱ्हाडीने मारून जखमी केल्याच्या कारणाने राग मनात धरून मयत शिवाजी थोरात (वय ५५ वर्षे रा. अंत्रोळी ता. दक्षिण सोलापुर) याला भीमराव रामचंद्र जाधव रा. कंदलगाव (मयताचा मेव्हणा) व तानाजी शिवाजी थोरात ( मयताचा मुलगा) याने मारून अपघाताचा बनवा केला होता. मंद्रूप पोलिसाच्या सतर्कते मुळे हा खुनाचा गुन्हा उघडकीस आला.

## ॲड. थोबडे यांची बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड

**सुराज्य/सोलापूर**

जेष्ठ विधिज्ञ व नामांकित कायदेतज्ञ ॲड मिलिंद थोबडे यांची महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे अध्यक्षपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या मुंबई येथील कार्यालयात १५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्व सदस्यीय बैठकीमध्ये बार कौन्सिलचे विद्यमान सदस्य ॲड मिलिंद थोबडे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



ॲड मिलिंद थोबडे यांनी सन १९८३ मध्ये आय एल एस विधी महाविद्यालय पुणे येथून कायद्याची पदवी प्राप्त करून त्यांचे वडील तथा सुप्रसिध्द कायदेतज्ञ ॲड काकासाहेब थोबडे यांचेकडे वकीली व्यवसायास सुरुवात केली व कायद्याचे प्रशिक्षण घेतले. ॲड मिलिंद थोबडे यांनी संपुर्ण महाराष्ट्रामध्ये अनेक नावाजलेले फौजदारी खटले चालवुन विधीक्षेत्रात यशस्वीपणे सुप्रसिध्द वकील म्हणून मानाचे स्थान प्राप्त केले आहे. सन २००५ मध्ये ॲड मिलिंद थोबडे यांनी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्षपद भूषविले.

मुंबई येथे बार कौन्सिलच्या ॲड राजेंद्र उमाप यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच संपन्न झालेल्या बैठकीत अध्यक्षपदी निवड करण्यात आली तर ॲड विवेकानंद घाटगे यांची निवड करण्यात आली व त्यांनी बार कौन्सिलच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. ॲड मिलिंद थोबडे यांची बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सर्व वकीलवर्गाकडून स्वागत होत आहे.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**प्रस्तावित योजनांची अधिसूचना**

विद्युत कायदा २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/ प्र.क्र.३१२/उर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (शासकीय राजपत्र पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखीरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

२. खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

(१) सोलापूर जिल्ह्यातील हसापूर, ता. अक्कलकोट येथे मे. चेतक एनर्जी यांच्या ५० मे.वॅ. सौर ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन १३२ के.व्ही. क्षमतेवर करणेबाबत. (i) १३२ के.व्ही. गोकुळ शुगर–अक्कलकोट वाहिनीवर लिलो करुन द्विदल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर १३२ के.व्ही. सोलर पार्क उपकेंद्रापर्यंत उभारणे – १ कि.मी सदर वाहिनीचा मार्ग हसापूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील महसूली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे. (ii) १३२ के.व्ही सोलार पार्क उपकेंद्राध्ये १३२ के.व्ही. वाहिनी बे – २ नं. (iii) १३२ के.व्ही. सोलार पार्क उपकेंद्राध्ये १x१३२ के.व्ही. ट्रान्सफर बस कपलर बे (iv) पी.एल.सी.सी. व फोटे उपकरणे (v) १३२ के.व्ही सोलार पार्क उपकेंद्राध्ये मिटरींग सीटी व पीटी (मेन व चेक) उभारणे. (vi) स्थापत्य कामे : गँट्री पायाभरणीचे बांधकाम आणि उपकरणाची पायाभरणी, केबल ट्रेंच, कंट्रोल रुम, मेटल स्प्रेडींग आणि जी.आय. पाईप लाईन, मीटरिंग रुम, डब्ल्यू.बी.एम. आणि बी.बी.एम. रोड, चेन लिंक फेंसिंग (vii) ए.बी.टी. मीटर व इतर संलग्न उपकरणे उभारणे. या योजनेचा अंदाजे खर्च रु. ६३१.६५ लाख इतका आहे.

३. परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती अधीक्षक अभियंता (योजना–I), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी–१९, बांद्रा–कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई– ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

**मुंबई**
**दिनांक : ०८.०८.२०२२**

**नसीर कादरी**
**संचालक (प्रकल्प)**

# अकलूजमध्ये जाज्वल्य देशभक्तीचा जागर

## अभूतपूर्व व दैदिप्यमान अमृतमहोत्सव सोहळ्यास लाखोंची उपस्थिती





✔ सुराज्य/अकलूज

अकलूज येथे स्वातंत्र्य अमृत महोत्सव समितीच्या वतीने भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते संपूर्ण देशात लक्षवेधी ठरलेल्या या कार्यक्रमासाठी लाखो नागरिकांनी सहभाग घेऊन याची देही याची डोळा हा दैदीप्यमान सोहळा पाहिला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा चे आवाहान केल्यानंतर संपूर्ण देशभर अमृत महोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण देशात लक्षवेधी ठरलेल्या अकलूज येथील सोहळा अनेक जणांनी प्रत्यक्ष आणि सोशल मीडियावर लाखो लोकांनी पाहिला आणि यामुळे देशभक्तीला उधाण आलेले दिसले. दिनांक १४ रोजी सायंकाळी नऊ वाजता रॅलीस सुरुवात झाली यामध्ये जिवंत देखावे सादर करण्यात आले होते, सगळीकडे तिरंगामय विद्युत रोषणाई आणि भारत माता की जय च्या घोषणा यामुळे अवघा परिसर दुमदुमून गेला होता. असा भव्य दिव्य सोहळा ग्रामीण भागात पहिल्यांदाच सादर झाला असावा इतके नियोजन या कार्यक्रमासाठी करण्यात आले होते २५ हजार विद्यार्थ्यांसह लाखो नागरिकांची उपस्थिती यामुळे कार्यक्रम ऐतिहासिक झाला. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, जि प सदस्या स्वरुपाराणी मोहिते पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. विविध बैठका घेऊन नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते त्यामुळे असंख्य नागरिक यात सहभागी झाले. आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांचेही या कार्यक्रमाला मार्गदर्शन लाभले. चित्ररथ रॅली अश्वपथक पथसंचलन यामुळे देशभक्तीचे वातावरण निर्माण झालेले दिसले तदनंतर विजय क्रीडा संकुल येथे देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम पार पडला यानंतर झेंडावंदन करण्यात आले. अतिशय दैदीप्यमान झालेल्या या सोहळ्याचे क्षण अनेक जणांनी आपल्या नयनांनी टिपले. अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या अचूक नियोजनातून झालेल्या या कार्यक्रमाने डोळ्यांचे पारणे फेडले.हा झालेला अमृत महोत्सव सोहळा अविस्मरणीय राहील असाच ठरला.

**जयसिंह मोहिते पाटील यांच्या अचूक नियोजनाचे दर्शन या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुन्हा एकदा पाहायला मिळाले अतिशय शिस्तबद्ध आणि परफेक्ट प्लॅनिंग असणारा हा कार्यक्रम ठरला. रॅलीमध्ये पथसंचलन अश्वपथक आणि जिवंत देखावे याशिवाय ढोल लेझीम यामुळे अवघे वातावरण देशभक्तीमय झाले होते. यामुळे प्रत्येकाच्या मनात देशाविषयी स्फुल्लिंग निर्माण होताना दिसत होते. असा भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल जयसिंह मोहिते पाटील उर्फ बाळदादा यांचे उपस्थितांनी आभार व्यक्त केले.**

# दुचाकी चोरीच्या घटना सुरूच

✔ सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने दत्त मंदिर जवळून दुचाकी चोरून नेल्याची घटना दि.१२ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अर्जुन पांडुरंग मोरे (वय-४८,रा.संत तुकाराम नगर,दाजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

**आणखी दोन गाड्या पळवल्याची नोंद**

त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.अर्जुन मोरे यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीजे.३८२९ ही दत्त मंदिर येथे हॅण्डल लॉक करून ठेवली होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने हॅंडलॉक तोडून डुप्लिकेट चावीचा वापर करून मोरे यांची दुचाकी चोरून नेली आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाही परीट हे करीत आहेत. दुसरी घटनाही विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेणुका नगर येथे दि.१३ ते १४ ऑगस्ट दरम्यान घडली.दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सी.एच.९८६९ ही अज्ञात चोरट्याने हॅण्डलॉक तोडून चोरून नेली आहे.याप्रकरणी द्राक्षायणी निखिल कांबळे (वय-२८,रा.रेणुका नगर) यांनी विजापूर नका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक शिर्के हे करीत आहेत.

### नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सोलापूर यांनी पावणेसहा वाजता बलिदान चौक येथे पदयात्रेला सुरुवात केली.या पदयात्रेमध्ये दोन मशाली लावण्यात आल्या होत्या.मात्र पदयात्रेत सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग १ यांनी मनाई केलेले असताना देखील पदयात्रेत दोन मशाली घेऊन पदयात्रा काढून नियमांचे उल्लंघन केले आहेत. याप्रकरणी पोह.दशरथ उद्धव भांगे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून समर्थ दरेकर महानगर मंत्री अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सोलापूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

### विटा फेकून केली दुखापत

कुत्रा भुंकल्याच्या कारणावरून विटा पायावर मारून दुखापत केल्याची घटना दि.१५ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास दयानंद कॉलेज येथे घडली.याप्रकरणी जयश्री सुरेश कोळी (वय-३८,रा. दयानंद कॉलेज, गुजराती वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सुरज प्रकाश कोळी (रा.दयानंद कॉलेज) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. जयश्री या त्यांच्या घरासमोर असलेल्या कट्ट्यावर बसल्या होत्या.त्यावेळी त्यांच्या शेजारी राहणारा सुरज कोळी यांनी फिर्यादी यांच्या घरातील कुत्रा भुंकल्याच्या कारणावरून फिर्यादी यांच्या शेजारी राहणारे उमेश घंटे यांच्या घराला लागून ठेवलेल्या दोन विटा उचलून जयश्री यांच्याया गुडघ्यावर मारल्या. तपास पोलीस नाईक पाटील हे करीत आहेत.





### मुलाकडून वडिलांना मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) वडिल काटप्पाला यांना मुलगा कमलेश याने तू आमच्या घरात कशाला आला आहे, येथून निघून जा असे म्हणत शिवीगाळ करत सळईचा तुकडा हातात घेऊन कपाळावर मारून दुखापत केल्याची घटना दि.१४ ऑगस्ट रोजी सात वाजण्याच्या सुमारास वैद्यवाडी प्रियंका चौक येथे घडली.याप्रकरणी वडील काटप्पा गोविंद शिवराल (वय-४४,रा.वैद्यवाडी,प्रियंका चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मुलगा कमलेश काटप्पा शिवराल (रा.वैद्यवाडी,प्रियंका चौक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोह. काळे हे करीत आहेत.

# उत्तर तालुक्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात

**✔ सुराज्य/सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण उत्साहात करण्यात आले. यावेळी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

### दिलीपराव माने शिक्षण संकुल

होनसळ येथील दिलीपराव माने प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ विद्यालयात ध्वजारोहण पृथ्वीराज माने युवा मंच अध्यक्ष सुनील जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी नागनाथ माने सरपंच राळेरास होते.

यावेळी संस्थेचे चेअरमन संभाजीराव भडकुंबे, उत्तरचे माजी सभापती रजनी भडकुंबे, मुख्याध्यापक राजेंद्र मोहोळकर, वि. का. सो. होनसळ चेअरमन सुखदेव पवार, भगवान कदम, महेंद्र खटके, सागर तांबे, दामोदर जाधव, राजकुमार शिंदे, संस्थेचे सचिव विकास बनसोडे, अभिजित भडकुंबे, अमित भडकुंबे, जमिल पटेल, पाटलोजी जानराव, कैलास कांबळे, नेताजी डांगे, सिताराम साबळे, महादेव पवार, दत्ता गायकवाड, अर्जुन साबळे उपस्थित होते. प्रास्ताविक उमेश जगताप, सुत्रसंचालन सचिन नाईकनवरे, आभार तात्यासाहेब तांबे यांनी मानले.

### न्यू हायस्कूल, वडाळा

उत्तर तालुक्यातील वडाळा येथील न्यू हायस्कूल येथे माजी सैनिक रंगनाथ ढवण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष बळीराम साठे, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन जितेंद्र साठे, माजी सैनिक, संस्थेतील पदाधिकारी, विभाग प्रमुख, मुख्याध्यापक खळसोडे, दत्ता मोकाशी यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### रुक्मिणीदेवी पतसंस्था, मार्डी

उत्तर तालुक्यातील मार्डी येथील रुक्मिणीदेवी पतसंस्थेच्या आवारात चेअरमन इंद्रजित पवार, एअरफोर्स अधिकारी रोहिदास गोंगणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, भाजप तालुका अध्यक्ष काशिनाथ कदम, सरपंच अविनाश मार्तंडे, व्हा. चेअरमन कमलाकर माने, शिवजी सोनार, प्रभाकर फुलसागर, संजय इनामदार, कादीर कुडले, रंगनाथ गुरव, पांडुरंग शेनमारे, मनगिन भालेकर, गणेश पवार, भानुदास बोराडे, अमोल बोराडे, सागर बोराडे, मलकु गवळी, पांडुरंग गोडसे, अझर शेख, तुकाराम भालेकर उपस्थित होते.

# कोळेगांव येथे शेतकऱ्यांनी काढली ट्रॅक्टर रॅली

✔ सुराज्य/पिलीव : कोळेगाव (ता. माळशिरस) येथे गावातील १०० शेतकऱ्यांनी एक रॅली काढून अभिनव उपक्रम साजरा केला. विजयसिंह मोहिते पाटील विद्यालयाच्या पटांगणावर गावातील सर्व तरुण ट्रॅक्टर मालक व चालक यांनी एकत्रित येत ट्रॅक्टर रॅलीला सुरुवात केली. हायस्कूलपासून सुरुवात झालेल्या ट्रॅक्टर रॅली माऊली नगर, सटवाई मळा, मराठी शाळा, फळवणी शिव ते सांगोला अकलूज रोड, महुद शिव, दुपडे वस्ती अशी रॅली काढली.

स्वयंमस्फूर्तीने युवा शेतकऱ्यांनी देशभक्तीपर गीते लावून मोठ्या उत्साहात रॅली संपन्न केली. येथील संग्राम दुपडे, नितीन सावंत, नामदेव सावंत, दत्तात्रय दुपडे, अक्षय दुपडे यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी काढली तिरंगा रॅली

✔ सुराज्य/सोलापूर



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त जिल्हा परिषदेत महिला अधिकारी चंचल पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी भव्य तिरंगा रॅली काढली.

सकाळी साडेसात वाजता हुतात्मा स्मृती मंदिर पासून निघालेली ही रॅली पंचायत समिती उत्तर सोलापूर समोरील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे आल्यानंतर जिल्हा परिषदेचे झेंडा वंदन पार पाडले. महिला रॅलीचे औचित्य साधून मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी झेंडा वंदन उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील यांच्या हस्ते करण्याचा निर्णय घेतला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन चंचल पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत ईशाधीन शेळकंदे, कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, शिक्षणाधिकारी किरण लोहार, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बगाडे, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, उपशिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, प्रशासन अधिकारी डॉ. इरफान सय्यद यांच्यासह जिल्हा परिषदेतील महिला अधिकारी उपस्थित होते.

# पंढरपूर तहसीलमध्ये ध्वजारोहण

✔ सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तहसील कार्यालय येथे उपविभागीय अधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी विक्रम कदम, तहसीलदार सुशील बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंडीत कोळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या विकासात लोकसहभाग हवा : जिल्हाधिकारी

## जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

✔ सुराज्य/सोलापूर



**सोलापूर विकासाच्या दिशेने वाटचाल करणारा सोलापूर जिल्हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करीत आहे. जिल्ह्याचा विकास जलदगतीने व्हावा, यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाला सक्रिय लोकसहभाग द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभात जिल्हाधिकारी शंभरकर बोलत होते. त्यांनी उपस्थित सर्वांना आणि जिल्हावासियांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय हिबारे, स्वातंत्र्यसैनिक पत्नी मथुराबाई भगरे, लक्ष्मीबाई तुकाराम चटके, सन्मुखबाई मेटी, मनपा आयुक्त पि. शिवशंकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अपर जिल्हाधिकारी संजीव जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी तंबाखूमुक्तीची सर्वांना शपथ देण्यात आली. जिल्हाधिकारी शंभरकर यांच्या हस्ते नक्षलग्रस्त भागात उत्कृष्ट कामगिरी केल्याने राष्ट्रपती यांचे शौर्यपदक मिळालेल्या पोलीस उपनिरीक्षक महारूद्र बबन परजने यांचा सन्मान केला. तसेच सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा, शैक्षणिक, आरोग्य, स्वच्छता क्षेत्रात काम केलेले नेहरू युवा केंद्राचे इम्रान मंगलगिरी, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत काम केलेल्या संस्थांमध्ये मोहोळ ग्रामीण रूग्णालयाचे डॉ. बाबर आणि नवजीवन बाल रूग्णालयाचे डॉ. शहा यांचा सन्मान करण्यात आला. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेले विद्यार्थी सागर लांडे, ओम पाटील यांचाही गौरव जिल्हाधिकारी शंभरकर यांनी केला.

# प्रगती मूकबधीर विद्यालयात अमृतमहोत्सव दिन साजरा

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील प्रगती मूकबधीर निवासी विद्यालय सोलापूर येथील शाळेत ७५ वा स्वातंत्रदिनाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विलास देवकर हे होते. यावेळी जिल्हा समाज कल्याण जि. प. सोलापूरचे वै. सा. का. अधिकारी सच्चिदानंद बांगर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे गणेश माडकर हे उपस्थित होते. त्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत कदम यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थापक माधव देवकर, सचिव विलास देवकर यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन सारिका देवधारे, आणि आभार अमोल गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रशांत जाधव, श्रीदेवी ढेकळे, शिवाजी जाधव, आनंगपाल नवगिरे, दिपाली रेड्डी, अमीर दंडोती, संतोष पवार, प्रतीक गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# महागाई भत्त्यात ३ टक्के तर रोजंदारीत २५ रुपयांनी वाढ

✔ सुराज्य/सोलापूर

**निवृत्त व कार्यरत महापालिका कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ तसेच रोजंदारी कामगारांच्या वेतनात २५ रुपयांनी वाढ करण्याची घोषणा महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केली.**

महापालिकेत सोमवारी महापालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर आयुक्त यांच्या समवेत अधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांनी तंबाखूमुक्तीची शपथ घेतली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, उपायुक्त विद्या पोळ, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त विक्रम पाटील, सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत, सहाय्यक नगर रचना संचालक केशव जोशी, लक्ष्मण चलवादी, माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, माजी नगरसेविका मनीषा हुच्चे, माजी नगरसेविका निर्मला तांबे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

निवृत्त व कार्यरत महापालिका कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ तसेच रोजंदारी कामगारांच्या वेतनात २५ रुपयांनी वाढ करण्याची घोषणा यावेळी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी केली. महागाई भत्ता तीन टक्के वाढ केल्याने पालिका तिजोरीवर दरमहा ४० लाख रुपये बोजा पडणार आहे. माहे ऑगस्ट पेड सप्टेंबरमध्ये ही वाढ लागू होईल. शासनाने महापालिकेचा आकृतिबंध मंजूर केला आहे. त्यानुसार शासनाने मंजुरी दिल्यानंतर रिक्त पदे भरण्यात येणार आहेत, असेही महापालिका आयुक्त असे पी. शिवशंकर यांनी स्पष्ट केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त विद्या पोळ आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन तपन डंके यांनी केले.

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयुक्तांची घोषणा**

**२८ जणांचा महापालिकेत गौरव!**

७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सोलापूर महापालिकेच्यावतीने महापालिकेतील २८ जणांचा गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्काराने सोमवारी आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी महापालिकेच्या विविध विभागातील एकूण २८ जणांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये सर्वाधिक आरोग्य विभागातील ९, मालमत्ता कर विभाग ८, घनकचरा व्यवस्थापन विभाग ३, झोन क्रमांक एक व सामान्य प्रशासन विभाग प्रत्येकी २ तर नगररचना, आरोग्य अभियंता, मुख्य लेखा परीक्षक, आयुक्त कार्यालय प्रत्येकी १ कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले आहे.



# स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला माकपची मशाल रॅली

✔ सुराज्य/सोलापूर

स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला रविवारी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) सोलापूर जिल्हा समितीच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर व माकपचे जिल्हा सचिव ॲड. एम. एच. शेख यांच्या नेतृत्वाखाली भव्य तिरंगा ध्वज सोबत मशाल मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.



रेल्वे स्थानक जवळील म. गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून कॉ. नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आले. ही मशाल मिरवणूक पुढे भैय्या चौक येथे कॉम्रेड लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांना पुष्पहार अर्पण करून पार्क चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून चार हुतात्मा पुतळा येथे मशाल मिरवणुकीचे अभिवादन सभेत रूपांतर झाले.

यावेळी माकपचे जिल्हा सचिव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अनिल वासम यांनी केले. यावेळी व्यासपीठावर कामिनी आडम, सिद्धप्पा कलशेट्टी, व्यंकटेश कोंगारी, नसीमा शेख, युसूफ मेजर, रंगप्पा मरेड्डी, म. हनिफ सातखेड, प्रा. अब्राहम कुमार, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, शंकर म्हेत्रे आदी उपस्थित होते.

# माढ्यातील मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शिबिरात १४१ शस्त्रक्रिया

## मोफत चष्मेवाटप व औषधोपचार

✔ सुराज्य/माढा

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व विलासराव देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त श्री संत कुर्मदास साखर कारखाना सहकार महर्षी गणपतराव साठे प्रतिष्ठान आणि जिल्हा अंधत्व निवारण समिती सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात एकूण १४१ रुग्णावरती यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या असून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाप्रसंगी दृष्टीहिनांना दृष्टी देऊन एक महान कार्य केलेबद्दल शासनाच्या वतीने दखल घेत संयोजकाचे अभिनंदन करण्यात आले आहे.




माजी आमदार ॲड धनाजीराव साठे कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे आणि नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट या कालावधीत तीन दिवसीय शिबिर माढ्यातील ग्रामीण रुग्णालयात पार पडले. प्रख्यात जिल्हा नेत्रतज्ञ डॉ गणेश इंदुरकर नेत्रतज्ञ श्रीमती डॉ चाकणे आणि डॉ अशोक मेहता यांच्या अथक प्रयत्नातून हे शिबिर पार पडले.

एकूण २५०रुग्णांची नेत्रचिकित्सा करण्यात आली यामध्ये १५० रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. दरम्यान विविध आजारामुळे काही रुग्णांवरती शस्त्रक्रिया करता न आल्याने एकूण १४१शस्त्रक्रिया आज अखेर पार पडल्या. आज या शिबिराचा सांगता समारंभ पार पडला. डॉ गणेश इंदुरकर यांनी उपस्थित रूग्णांना घ्यावयाची काळजी यावरती मार्गदर्शन केले. रूग्णांना मोफत चष्म्यांचे व औषधांचे वाटप यावेळी करण्यात आले. याप्रसंगी नगरपंचायत च्या उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे बांधकाम सभापती अरूण कदम नगरसेवक अजिनाथ माळी नगरसेविका गीतांजली देशमुख रेशमा लंकेश्वर सुनिता राऊत शबाना बागवान निर्मला थोरात तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ शिवाजी थोरात डॉ अशोक मेहता डॉ सदानंद व्हनकळस डॉ प्रीती भंडारी डॉ सचिन येतनाळकर सिव्हिल हॉस्पिटलचे डॉ मलंग डॉ ऐश्वर्या कोल्हे आदी उपस्थित होते. शिबिरात सहकार्य करणाऱ्या सर्व डॉक्टर्स आरोग्य कर्मचारी यांचा संयोजन समितीकडून यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण राऊत यांनी केले. सूत्रसंचालन अमोल चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन समाधान राऊत यांनी केले.

> * स्वातंत्र्याचा ७५ व्या दिनी ७५ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त संपूर्ण देशात विविध उपक्रम राबवले जात असतानाच माढ्यात स्व विलासराव देशमुख यांच्या पुण्यतिथींचे औचित्य साधत नेत्रचिकित्सा व मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिर पार पडले.
> * सोमवार दिनांक १५ ऑगस्ट रोजी अमृतमहोत्सव साजरा करत असतानाच सकाळपासून रात्री साडेनऊ पर्यत ७५ रुग्णावरती यशस्वी शस्त्रक्रिया करीत सामाजिक बांधिलकी जपली.
> * शिबिराच्या तिसर्या दिवस अखेर एकुण १४१ जणावरती शस्त्रक्रिया पार पडल्या. एकुणच या उपक्रमांची शासनाच्या आरोग्य विभागाकडून दखल घेत अभिनंदन केले आहे.

## अक्कलकोट मध्ये स्वातंत्र्यसैनिक व माजी सैनिकांचा सन्मान

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशभरात साजरा होत आहे. हा दिवस भारतीयांना अनुभवता यावा याकरिता अनेकांनी प्राणाची आहुती दिली. त्यांच्या बलिदानातून स्वातंत्र्यांची पहाट आपल्या नशिबी आली. स्वातंत्व्वय सैनिकांनी केलेल्या अपार कष्ट व त्यागामुळेच देशास स्वातंत्व्वय मिळाले व ते अबाधित राखण्यासाठी सैनिक आपले योगदान देत आहेत असे गौरवोद्गार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. पंचायत समिती अक्कलकोट येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व स्वराज्य अभियान अंतर्गत आयोजित केलेल्या स्वातंत्र सैनिक व माजी सैनिक यांच्या सत्कार सोहळयात बोलत होते. तसेच तालुक्यामध्ये गावोगावी व्यायाम शाळा बांधण्यासाठी प्राधान्य देणार व सर्व अधिकारी यांनी ही माजी सैनिक स्वातंत्र्यसैनिक यांची शासकीय कामे प्राधान्याने करावी अशी सूचना यावेळी आ कल्याणशेट्टी यांनी केले. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी केले. कार्यक्रमातच पंतप्रधान आवास योजना व राज्य पुरस्कृत आवास योजना कार्यक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, गटशिक्षणाधिकारी कुदसिया शेख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विन करजखेडे, डॉ दिनेश मुरूमकर, उमेश काटे, दयानंद परिचारक, बी. एस. तुळजापुरे, सिध्दया मठ, पी. एल. कोळी एस. जी. घुगरे जमादार आदी उपस्थित होते.

## राऊत यांच्याकडून माळीवस्ती शाळेला वॉटरफिल्टर भेट

✔ **सुराज्य/मोडनिंब** : अरण केंद्रातील 'जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळीवस्ती, ही एक छोटीशी वस्तीशाळा. स्वच्छ शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत या शाळेचे रूपडे पालटले होते बऱ्याच भौतिक सुविधा या शाळेत उपलब्ध झाल्या होत्या. या शाळेने स्वच्छ शाळा सुंदर शाळा यामध्ये तालुक्यात द्वितीय क्रमांक ही प्राप्त केला होता या शाळेत येणारे विद्यार्थी जवळपासच्या एक ते दीड किलोमीटर वरून शाळेत येतात त्यांना शाळेत येताना पाण्याच्या बाटल्या पिण्यासाठी आणाव्या लागत होत्या. हे विद्यार्थ्यांचे ओझे कमी करण्यासाठी या शाळेतील शिक्षकांनी दानशूर पालकांना वॉटर फिल्टर देण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देऊन अरण चे माजी सरपंच पांडुरंग राऊत व शाळेचे माजी विद्यार्थी आदर्श शिक्षक हनुमंत राऊत यांनी शाळेसाठी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून शाळेसाठी वॉटर फिल्टर भेट दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पाण्याचे ओझे कमी होऊन त्यांना पिण्यासाठी निर्धोक पाणी उपलब्ध होणार आहे.

## नातेपुते येथे गोकुळाष्टमीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

✔ **सुराज्य/नातेपुते** : प. पू. श्री. भाईनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने व दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नातेपुते येथील पर्वतेश्वर मंदिरात गोकुळाष्टमीनिमित्त गोपाळकाला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर घेण्यात येणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाला ३६ वर्षे पूर्ण झाले आसुन या कार्यक्रमांमध्ये गुरुवार दिनांक १८ रोजी रात्री ९ : ३० ते १० : ३० अंकुश भांड व रात्री १० : ३० ते ११ : ३० धैर्यशीलभाऊ देशमुख यांचे प्रवचन होणार आहे तसेच शुक्रवार दिनांक १९ रोजी सकाळी ९ : ३० ते अकरा तीस समस्त महिला भजनी मंडळ नातेपुते यांचे सुश्राव्य भजन व दुपारी १२ वाजता दहीहंडी कार्यक्रम व १२:३० वाजता काला व महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे तरी गोकुळ अष्टमी व गोपाळकाला उत्सवास भाविक भक्ताने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गोकुळ अष्टमी व गोपाळकाला उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## इस्कॉनतर्फे सोलापुरात श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावना मृत संघ दरवर्षीप्रमाणे येणारी श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव आयोजन करण्यात आले आहे जगभरातील इस्कॉनच्या मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव अतिशय उत्साहात साजरा होणार आहे सोलापुरातील अक्कलकोट रोड वरील जकात नात्याजवळ इस्कॉन श्री राधा दामोदर मंदिरातील भव्य जागेत हा महोत्सव विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येणार आहे अशी माहिती कृष्ण भक्त दास यांनी पत्रकार परिषदेत दिले

बुधवार दिनांक १७ ऑगस्ट ते २० ऑगस्ट ऑगस्टपर्यंत श्रीपत भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे आदरणीय अनंत शेष प्रभुजी इस्कॉन नागपूर हे या भागवत कथेचे पर्वत आहेत अतिशय मधुर कीर्तन व रसाळ वाणी द्वारा दररोज सायंकाळी सहा ते रात्री आठ पर्यंत हा कार्यक्रम इस्कॉनच्या ग्राउंड वर साजरा होणार आहे बुधवार दिनांक १% ऑगस्ट रोजी श्रीमद् भागवत शोभायात्रा पूर्व भागातील बालाजी मंदिरातून भागवत ग्रंथ व कळस शोभायात्राचे आयोजन करण्यात आले आहे या शोभायात्रात ४०० ते ५०० भक्तगण सामील होणार आहेत गुरुवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी सकाळी आठ ते साडेनऊ पर्यंत तुळशी लक्ष अर्चना उपस्थित भक्तांद्वारे विष्णू सहस्रनाम या मंत्राद्वारे करण्यात येईल शनिवार दिनांक १९ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी संपूर्ण दिवसभर विविध अध्यात्मिक कार्यक्रमात होणार आहेत सकाळी साडेचार ते रात्री आठ पर्यंत मंगल आरती नरसिंह आरती तुळशी वंदना गुरुपूजन अधिकरण कार्यक्रमातील सकाळी साडेआठ ते अकरा वाजेपर्यंत विश्वशांती श्री सुदर्शन यज्ञ श्री भगवत यज्ञाद्वारे संपन्न होईल सायंकाळी पाच ते आठ वाजेपर्यंत श्री राधा दामोदर यांचे अभिषेक अनेक कार्यकर्त्यांच्या हस्ते करण्यात येईल इच्छुक व्यक्तींनी देखील संस्थे भगवंताच्या अभिषेक कार्यक्रमात सहभाग घ्यावा सायंकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत विशाल मंडपात संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे रात्री बारानंतर ५६ बुक अर्पण महाकिर्तन महारथी व शेवटी उपस्थित सर्व समुदायासाठी महाप्रजासाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दिनांक २० ऑगस्ट रोजी इस्कॉन संस्थेचे संस्थापक प्राचार्य कृष्णा कृपा मूर्ती वेदांत स्वामी श्री प्रभात यांचे १२६ वी जयंती निमित्त व्यासपूजा महारस्व संपन्न करण्यात येणार आहे यावेळी सकाळी नऊ ते दुपारी बारापर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सोलापुरातील समस्त भाविक भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

## ट्रकच्या धडकेने दुचाकी चालक ठार

✔ **सुराज्य/सोलापूर** : गॅसचे सिलेंडरची वाहतूक करणाऱ्या ट्रकच्या धडकेने दुचाकी वरील एकजण ठार तर पाठीमागे बसलेले जखमी झाले. हा अपघात वागदरी (ता. अक्कलकोट) येथील चौदा मैल चौकात १५ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास घडला. सुभाष तात्याराव बगले (वय ५० रा. किणी) असे मताचे नाव आहे. तर लक्ष्मण जाधव वय (६०) हे जखमी झाले. ते दोघे १५ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास वागदरी येथून दुचाकीवरून आपल्या गावाकडे निघाले होते. त्यावेळी वागदरी येथील चौकात समोरून पार्वती गॅस कंपनीची एमएच१३-एएन-४७२१ या क्रमांकाची ट्रक धडकल्याने हा अपघात घडला. अक्कलकोट उत्तर पोलिसात या अपघाताची नोंद झाली. सहाय्यक निरीक्षक भावीकट्टी पुढील तपास करीत आहेत.

## कर्मचाऱ्यास मारहाण; एकावर गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर** : १५ ऑगस्टचा कार्यक्रम सुरु असताना शाळेत घुसून कर्मचाऱ्याचे बियरच्या बाटलीने डोके फोडले. ही घटना कासारवाडी (ता. बार्शी) येथील जिल्हा परिषद शाळेत घडली.

चेतन विनायक कांबळे (वय ३३) असे जखमी कर्मचाऱ्यांचे नाव आहे. त्यांना मारहाण केल्याप्रकरणी किरण धनाजी चतुर (रा. कासरवाडी) याच्याविरुध्द बार्शी तालुक्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला. चेतन कांबळे हे कासरवाडी येथील जि प शाळेत १५ ऑगस्टचा कार्यक्रम सुरू होता. दहा वाजेच्या सुमारास चेतन कांबळे हे मुलांसाठी खाऊ चे वाटप करीत होते. त्यावेळी किरण चतुर हा दुचाकी चालवत शाळेत घुसला. तेव्हा कांबळे यांनी दुचाकी बाहेर नेण्यात सांगितले. तू मला सांगणारा कोण? असे म्हणत त्याने चापटाने मारहाण केली त्यानंतर खिशातील बियरची बाटली काढून त्यांच्या डोक्यावर प्रहार केला. अशी नोंद बार्शी पोलिसात झाली. हवालदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.

### पालिका कर्मचाऱ्याची गळफासाने आत्महत्या

मजरेवाडी परिसरातील आनंद नगर (भाग २) येथे राहणाऱ्या रुकूम अकबर शेख (वय ४२) या पालिका कर्मचाऱ्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. सोमवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली. कर्ज आणि सावकाराच्या त्रासाला कंटाळून त्याने हा प्रकार केल्याची माहिती आहे. तपास हवालदार फुलारी करीत आहेत.

### रमणनगर येथे महिलेची गळफासाने आत्महत्या

अक्कलकोट रोडवरील रमणनगरात राहणाऱ्या धानाबाई रामय्या स्वामी (वय ६५) या वृध्द महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. त्यांचा मृतदेह घरातील खिडकीला दोरी आणि कपड्याच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे. हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत.

## भाजीपाल्यांच्या दरात घसरण

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मंगळवार, १६ ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीनुसार गाजर, गवार, फ्लॉवर, लसूण, घेवडा,



हिरवी मिरची, लिंबू, बटाटा, राजगिरा आदी भाजीपाल्यांच्या किंमती प्रतिक्किंटल २०० ते हजार रूपये कमी झाल्या. तर वांगी, काकडी, चाकवत, मेथी भाजी, कांदा, तांदूळ, टोमॅटो, गहू यांचे दर स्थिर राहिले. तसेच कारली, कोथिंबीर, कांदा पात, शिराळी दोडका, शेपू यांचे दर प्रतिक्किंटल १०० ते ५०० रूपये वाढ झाली.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | १, ००० | २, २०० | १, ४०० |
| कारली | १, ५०० | ५, ००० | ३, ००० |
| वांगी | १, ५०० | ६, ००० | ३, ००० |
| कोबी | ७०० | १, ५०० | १, ००० |
| ढोवळी मिरची | ८०० | २, ७०० | २, ००० |
| गाजर | १, ००० | २, ००० | १, ५०० |
| गवार | ३, ५०० | ७, ००० | ४, ००० |
| कोथिंबीर | ३०० | ८०० | ५०० |
| काकडी | १, ५०० | ४, ००० | ३, ००० |
| फ्लॉवर | २४० | ५६० | ३२० |
| लसूण | १, ००० | २, ८०० | २, १०० |
| घेवडा | २, ५०० | ६, ००० | ४, ००० |
| हिरवी मिरची | २, ००० | ५, ००० | ३, ००० |
| अंबाडी भाजी | ४०० | ५०० | ४०० |
| कांदा पात | ६०० | १, ००० | ८०० |
| बटाटा | ७०० | २, ५५० | २, २०० |
| राजगिरा | ३०० | ५०० | ४०० |
| लिंबू | १, ५०० | ३, ६०० | २, २०० |
| तांदूळ | २, ९८० | ६, २८० | ३, ६३५ |
| दोडका | १, ५०० | ५, ००० | ३, ००० |
| शेपू | ३०० | ६०० | ४०० |
| सोयाबिन | ६, १५० | ६, १५० | ६, १५० |
| पालक | ६०० | १, २०० | ८०० |
| टोमॅटो | २०० | १, ५०० | ७०० |
| गहू | २, २९५ | ३, ३०५ | २, ६९५ |

# जिल्ह्यात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव उत्साहात

### श्री रामलिंगेश्वर प्रशाला

✔ **अक्कलकोट** : श्री क्षेत्र तीर्थ ता. द. सोलापूर येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात ७५वा स्वातंत्र्वय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे केली. १०वी, १२वी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले रामलिंग उदंडे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. जगन्नाथ जाधव यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची पुस्तके भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीते सादर केली. यावेळी ॲड. सुहास जाधव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास हणमंतराव पाटील, प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार रामलिंग उदंडे, केदार पाटील, जगन्नाथ जाधव, द्यानेश्वर विभुते, रामप्रसाद बिराजदार, उत्तम केंगार, ग्रामस्थ, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राजीव कोरे यांनी केले. आभार प्रदर्शन महेश पट्टणशेट्टी यांनी केले. खाऊ वाटपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### नवतरुण मंडळ

✔ **वेळापूर** : वेळापुर ता. माळशिरस येथील नवतरुण गणेशोत्सव मंडळ व्यापारी पेठ वेळापूर यांच्यावतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने भव्य पायी तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीची सुरुवात सायंकाळी ५:३० वाजता राष्ट्रगीताने होऊन वेळापूर गावचे सुपुत्र सेवानिवृत्त सैनिक मेजर भिमराव इंगोले यांच्या हाती रॅलीचा मुख्य तिरंगा ध्वज मान्यवरांच्या व मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या हातून देण्यात आला. या रॅलीमध्ये सहभागी तिरंग्यात सजवलेल्या बैलगाडा, महालक्ष्मी बँड कराड, हलगी ग्रुप, लहान मुला-मुलींचे सजिव महापुरुषांचे देखावे व नवतरुण मंडळाने तयार केलेला २७५ फूट तिरंगा ध्वज हा या रॅलीचे मुख्य आकर्षण होते. सदर रॅली व्यापारी पेठ ते जुना बाजारतळ, पालखी चौक, एस टी स्टँड, आझाद गल्ली, काळा मारुती रोड, क्रांती चौक ते व्यापारी पेठ अशा मार्गाने संपन्न झाली. या रॅलीमध्ये वेळापूर गावातील लहानापासून ते वयोवृध्द पुरुष-महिला





मंडळींचा उत्स्फूर्त सहभाग होता. रॅलीची सांगता मंडळाचे अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली रात्री ८:१५ मिनिटांनी वंदे मातरम् ने करण्यात आली.

### अक्कलकोट काँग्रेस

✔ **अक्कलकोट** : भारत देशास स्वातंत्व्वय मिळून आज ७५ वर्षे पुर्ण झाली. स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने मोठ्या प्रमाणावर चळवळ उभी केली होती. अनेक काँग्रेस नेत्यांच्या कुटुंबांची वाताहत झाली. अनेक नेत्यांना प्राणास मुकावे लागले. हा इतिहास आजच्या युवकांनी घरोघरी सांगावा असे प्रतिपादन माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त काँग्रेसने पाच दिवस पदयात्रेचे आयोजन केले होते. याचा समारोप १५ ऑगस्ट रोजी करण्यात आला. या प्रसंगी म्हेत्रे बोलत होते. काँग्रेसच्या वतीने शहरामध्ये सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. युवकांनी या रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दुचाकी वाहनास तिरंगा लावण्यात आला होता. या रॅली मध्ये युवा नेत्या शितल म्हेत्रे, शिवराज म्हेत्रे, अशपाक बळोरगी, विजयकुमार हत्तुरे, मल्लिकार्जून पाटील, अरूण जाधव, दिलीप सिध्दे, सद्दाम शेरीकर, नावेद डांगे, मत्तीन पटेल, सरफराज शेख, मुबारक कोरबू, शाकिर पटेल, समीर शेख, चंदन आडवीतोटे, रामचंद्र समाणे, श्री इचगे, नितेश राठोड, विलास राठोड, लाला राठोड, फारूक बबर्ची, वली कुरेशी, शबाब शेख, मेन्नोद्दिन कोरबु, वकील बागवान, उल्हास सुर्यवंशी, जब्बार बागवान, सलील येळसंगी, शिवराज स्वामी, बसवराज आळळोळी, सुनिता हडलगी, मंगल पाटील, सिध्देश्वर हत्तुरे आदी उपस्थित होते.

### लोकविकास हायस्कुल

✔ **वेळापूर** : लोकविकास शिक्षण संस्थेमध्ये स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. हा महोत्सव दिनांक १३ ते १५ ऑगस्ट यादरम्यान राबवण्यात आला. १३ ऑगस्ट रोजी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रशांत पाटील, १४ तारखेला बी एस एफ जवान अनिल काळे पाटील व १५ ऑगस्ट दिवशी अरविंद राऊत हे उपस्थित होते. १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यानंतर राष्ट्रगीत ध्वजगीत व राष्ट्रभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. यानंतर विद्यार्थ्यांनी शालेय कवायत केली. यानंतर लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल लोकविकास मराठी मिडीयम स्कूल व लोकविकास ज्युनिअर कॉलेजमधील मुलांची भाषणे झाली. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल व लोकविकास मराठी मिडीयम स्कूल मधील मुलांनी राष्ट्रभक्तीपर गीतावर नृत्य सादर केली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांनी शाळेतील मुलांना अनमोल असे मार्गदर्शन आपल्या भाषणामधून केले. यावेळी कार्यक्रमाला गोपाळराव देव प्रशाला माळशिरसचे माजी मुख्याध्यापक भीष्माचार्य कुदळे, लोकविकास शिक्षण संस्थेचे सचिव चंद्रकांत नवले, शिवगंगा दूध डेरीचे चेअरमन भागवत गायकवाड, सुधाकिनी राऊत, डॉ. धनंजय म्हेत्रे, त्याचबरोबर लोकविकास पतसंस्थेचे संचालक सावता म्हेत्रे, विठ्ठल म्हेत्रे, भीमराव बनकर, सचिन बनकर, रमेश बनकर, योगेश बनकर, सोमनाथ बनकर, तानाजी राजे उपस्थित होते. यावेळी लोकविकास मराठी मिडीयम चे मुख्याध्यापक किशोर पिसे लोकविकास जुनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल पांढरे लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक अजित बनकर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल साठे, प्रास्ताविक विजया चापले, अनुमोदन सिनाप्पा शेंडगे, तर आभार राया वाघमारे यांनी मानले

### पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने संचलन

✔ **पंढरपूर** : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी भारताच्या सन्माननीय पंतप्रधानांनी घोषित केलेल्या हर घर झेंडा अभियानात सहभागी होऊन सम्यक क्रांती मंच यांच्यावतीने पंढरपूर नगरपरिषद प्रस्तावित बुध्दभूमीवर ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी पंढरपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक अंबादास धोत्रे, रिपाइंचे पंढरपूर शहर अध्यक्ष ऍड. किर्तीपाल सर्वगोड, भाजपाचे अध्यक्ष उमेश सर्वगोड, रिपाइंचे अमित कसबे, यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकाविण्यात आला. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला सन्मानपूर्वक मानवंदना देताना राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. सम्यक क्रांती मंचचे संस्थापक सिध्दार्थ जाधव यांनी भारतीय स्वातंत्र्वय लढ्यातील सेनांनीप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि भारताच्या एकात्मतेसाठी सर्वांनी कटीबध्द राहण्याचे आवाहन केले. या महोत्सवात पंढरपूर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष तथा रिपाईचे महाराष्ट्र प्रदेश संघटक सुनील सर्वगोड, पंढरपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक डी. राज सर्वगोड, आदी मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते. हा महोत्सव उत्साहात पार पाडण्यासाठी सम्यक क्रांती मंचचे अध्यक्ष प्रशांत लोंढे, सोलापूर जिल्हाध्यक्ष रवींद्र शेवडे, सचिव स्वप्नील गायकवाड, रवि सर्वगोड, कृष्णाजी लिहिणे, प्रकाश वाळके, अण्णा पोफळे, विकास कांबळे सर, राजू बंगाळे, बाळासाहेब देवकर, अरविंद कांबळे, प्रवीण माने, सुखदेव कांबळे तसेच रमामाता महिला मंडळाच्या अध्यक्षा काजल भोरकडे, संगीता सर्वगोड, विजया सर्वगोड आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी मारुती सर्वगोड यांचेकडून उपस्थितांना मिठाई वाटण्यात येऊन या महोत्सवाची सांगता करण्यात आली.

# निवडणूक आयोगाच्या पडद्यामागे हालचाली

सुराज्य/नवी दिल्ली

**शिवसेना कुणाची, धनुष्यबाण कुणाचा? या दोन प्रश्नांची उत्तरे एकनाथ शिंदे यांच्या बंडाला दोन महिने पूर्ण होऊनही आणखी मिळालेली नाहीत. सर्वोच्च न्यायालयात दोन्ही गटांनी विविध याचिका दाखल केल्या आहेत. मुंबई महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीअगोदर चिन्हाला प्रश्न निकाली लागावा, यासाठी एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं होतं. यानंतर न्यायालयाच्या दारी फैसला होण्याअगोदर निवडणूक आयोग चिन्हाचा निकाल लावेल, अशी भीती मनात असल्याने उद्धव ठाकरे गटाने तातडीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यानुसार झालेल्या सुनावणीवेळी निवडणूक आयोगाच्या आधी सर्वोच्च न्यायालय निरीक्षण नोंदवणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना हा मोठा दिलासा मानण्यात येतोय. याआधीच्या सुनावणीवेळी शिवसेनेच्या चिन्हाबद्दल कोणताही निर्णय घेऊ नका, असे आदेश न्यायालयाने दिले होते.**

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचं प्रकरण तातडीने सुनावणीसाठी मांडण्याचा ठाकरे गटाकडून प्रयत्न होतोय. पण न्यायालयाने या ना त्या कारणाने तीन वेळा सुनावणीची तारीख पुढे ढकलली आहे.

प्रकरण घटनात्मक पीठाकडे द्यायचं की नाही या निर्णयासाठी सुनावणी लांबणीवर टाकत असल्याचा निर्वाळा सरन्यायाधीशांनी दिला आहे. दुसरीकडे अशावेळी पक्ष चिन्हाबाबत समोरील गटाकडून निवडणूक आयोगाकडे पत्र पाठवलं गेलंय, तसेच याचिकाही दाखल केली असल्याचं आणि निवडणूक आयोगाने तारीख दिल्याचंही ठाकरे गटाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलं आहे. आज याचविषयी झालेल्या सुनावणीवेळी निवडणूक आयोगाच्या आधी सर्वोच्च न्यायालय निरीक्षण नोंदवणार आहे. १९ तारखेला सरन्यायाधीश रमणा चिन्हाविषयी निरीक्षण नोंदवतील.




सरन्यायाधीश रमणा २६ ऑगस्ट रोजी निवृत्त होणार असल्याने त्यापूर्वीच दोन्ही गटाच्या याचिकांचा निकाल लागणार की त्या घटनापीठाकडे सोपवल्या जाणार, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन्ही गटांकडून सर्वोच्च न्यायालयात चार वेगवेगळ्या विषयांवर याचिका दाखल आहेत. या याचिकांवर पुढील सुनावणी २२ तारखेला पार पडणार आहे. पण तत्पूर्वी १९ ऑगस्ट रोजी निवडणूक आयोग

### शिवसेना सावध, आता सर्वोच्च न्यायालय धनुष्यबाण कोणाला देणार?

शिवसेनेच्या पक्षचिन्हावर निरीक्षण नोंदवणार असल्याने उद्धव ठाकरेंसाठी हा दिलासा मानण्यात येतोय. सर्वोच्च न्यायालयावर आमचा विश्वास आहे. ते आम्हांला न्याय देतील, अशी आशा उद्धव ठाकरे वारंवार बोलून दाखवत आहेत. मातोश्रीवर येणाऱ्या शिवसैनिकांना संबोधित करताना उद्धव ठाकरे वारंवार सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीचा संदर्भ देत आहेत. शिवसेना कुणाची आणि धनुष्यबाण कुणाचा? असा प्रश्न उभा ठाकलेला असताना पुढच्या तीन दिवसांनी होणारी सुनावणीने राज्याच्या राजकारणाची दिशा पलटू शकते, असा शक्यता राजकीय जाणकार बोलून दाखवत आहेत.

## धक्कादायक!

### स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमानंतर सरकारी शाळेत अफूचे वाटप

राजस्थान : स्वातंत्र्यदिनी झेंडावंदन केल्यानंतर एका सरकारी शाळेत अफू (Opium ) आणि पोपीचे (Poppy) वाटप करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील गुडमालानी गावात ही घटना घडली आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच शिक्षणाधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

शिक्षणाधिकारी ओमप्रकाश बिश्नोई यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाडमेरच्या गुडमालानी भागातील एका सरकारी शाळेत ही घटना घडली. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमानंतर कांही लोक शाळेत पोहोचले होते. ते एकमेकांना अफू देत होते. या घटनेची माहिती मिळताच ते शाळेत पोहोचलो. मात्र, तोपर्यंत तिथे कोणीही नव्हतं. या घटनेची चौकशी सुरू असून आम्ही विद्यार्थ्यांचे जबाब नोंदवत आहोत, अशी माहितीही त्यांनी दिली.

### 'अमूल'च्या दूधदरात वाढ

राजस्थान : गेल्या कांही महिन्यांपासून महागाईमुळे आधीच सामान्यांना महिन्याचा ताळेबंद मांडताना मोठी कसरत करावी लागत असताना आता पुन्हा एकदा आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे.

देशातील अग्रगण्य दूध उत्पादक कंपनी असलेल्या अमूलनं दुधाच्या किमती वाढवल्या आहेत. अहमदाबाद, गुजरात, दिल्ली, एनसीआर, मुंबई आणि पश्चिम बंगाल या ठिकाणी हे नवे दर लागू होणार असल्याचं कंपनीकडून सांगण्यात आलं आहे. अमूल दूध कंपनीकडून दुधाचे दर प्रतिलिटर २ रुपयांनी वाढवण्यात आले आहेत. कंपनीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, आता अर्धा लिटर अमूल गोल्डची नवीन किंमत ३१ रुपये तर अर्धा लिटर अमूल ताजाची किंमत २५ रुपये झाली आहे. याशिवाय अमूल शक्ती दुधाच्या प्रत्येक अर्धा लिटरच्या पाकिटासाठी २८ रुपये मोजावे लागणार आहेत.

## बस दरीत कोसळून आयटीबीपीचे ६ जवान शहीद



सुराज्य/श्रीनगर

जम्मू-काश्मीरमध्ये चंदनवाडीत आयटीबीपीच्या जवानांची बस दरीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. या बसमध्ये एकूण ३९ जवान प्रवास करत होते. या अपघातात आयटीबीपीचे ६ जवान शहीद झाल्याची माहिती समोर आली आहे. अपघातात ३२ जवान जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने रूग्णालयात हलवण्यात आले आहे. अपघात एवढा भीषण होता की यात ६ आयटीबीपीच्या जवानांचा मृत्यू झाला आहे.

३९ जवानांपैकी ३७ आयटीबीपीचे तर २ जम्मू-काश्मीर पोलिसांचे असल्याचं सांगण्यात येत आहे. ज्या बसमध्ये जवान प्रवास करत होते ती सिव्हिल बस होती आणि अचानक ब्रेक निकामी झाल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या दरीत कोसळली.

### अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी गेले होते

हे जवान चंदनवाडीहून पहलगामच्या दिशेने जात होते. पहलगामच्या फ्रिसलानमध्ये ही बस नदीत पडली आहे. अमरनाथ यात्रेसाठी या भागाच्या सुरक्षेसाठी जवान तैनात करण्यात आले होते. या अपघातात अनेक जण जखमी झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### बस २०० फूट खोल दरीत कोसळली

अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी चंदनवाडीहून ही बस पहलगामच्या दिशेने येत होती. अपघात एवढा मोठा होता की बस चंदनवाडी येथे सुमारे २०० फूट खाली दरीत कोसळसली. त्यानंतर या बसचा स्फोट झाला.

## बिलकिस बानो प्रकरणातील ११ दोषींची सुटका

अहमदाबाद : गुजरातमध्ये गोध्रा दंगलीवेळी बिलकिस बानो या महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याप्रकरणी सजा भोगत असलेल्या ११ दोषींची सुटका करण्यात आली आहे. गुजरात सरकारच्या माफी धोरणानुसार हा निर्णय घेण्यात आला.

गुजरातमध्ये २००२ मध्ये गोध्रा दंगल झाली होती. ३ मार्च २००२ मध्ये दाहोद जिल्ह्यातील रंधिकपूर गावात बिलकिस बानो यांच्यावर सामूहिक बलात्कार झाला होता. तर त्यांच्या कुटुंबातील सात लोकांची हत्या करण्यात आली होती. बिलकिस बानो यांच्यावर बलात्कार झाला, त्यावेळी त्या पाच महिन्याच्या गर्भवती होत्या.

राधेश्याम शाही, जसवंत चतुरभाई नाई, केशुभाई वदानिया, बकाभाई वदानिया, राजीवभाई सोनी, रमेशभाई चौहान, शैलेशभाई भट्ट, बिपिन चंद्र जोशी, गोविंदभाई नाई, मितेश भट्ट आणि प्रदीप मोढिया यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आली होती. आरोपींना २००४ मध्ये अटक करण्यात आली होती.

## सावरकरांच्या पोस्टरवरुन तणाव



सुराज्य/शिवमोगा

कर्नाटकातील शिवमोगा येथे सोमवारी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे छायाचित्र असलेला फलक लावण्यावरुन मोठा तणाव निर्माण झाला आहे. या घटनेत एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले आहेत. तणावपूर्ण स्थिती निर्माण झाल्याने परिसरात १४४ कलम लागू करण्यात आलं आहे.

### दोन गट एकमेकांना भिडले तरुणावर धारदार शस्त्राने वार

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे छायाचित्र असलेला फलक लावण्यास एका गटाने आक्षेप घेतला. त्या ठिकाणी टीपू सुल्तान यांचे छायाचित्र असलेला फलक लावण्याचा प्रयत्न या गटाने केला. त्यावरून दोन गटांत संघर्ष झाल्या होता. यावेळी गांधीनगर भागात एका युवकावर चाकू हल्ला करण्यात आला आहे.

जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव प्रेमसिंह असे असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शहरातील तणावपूर्व स्थिती पाहता प्रशासनाने तीन दिवसांसाठी शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## जन्मदात्रीनेच पाजले तीन मुलांना विष

उत्तरप्रदेश : पतीशी झालेल्या वादातून ३५ वर्षीय महिलेने आपल्या तीन मुलांची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. उत्तरप्रदेशच्या गाझीपूर जिल्ह्यातील दधाणी भानमाल राय या गावातली ही घटना आहे. सुवहाल पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा गुन्हा घडला आहे. सुनीता यादव असे आरोपी महिलेचे नाव आहे. आरोपीने विष दिल्यानंतर उपचारादरम्यान अत्यवस्थ तिनही मुलांचा मृत्यू झाला आहे.

आरोपी महिलेला अटक करण्यात आली असून तिच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिमांशू (वय ११ वर्ष), प्रियांशू (वय ८ वर्ष) आणि दिव्यांशी (वय ७ वर्ष) अशी मृतांची नावे आहेत. त्यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे.

## मुले घरी नसताना सासू-सुनेची निर्घृण हत्या

सुराज्य/नवी दिल्ली

**गुन्ह्यांच्या घटना वाढत असताना देशाला हादरवून सोडणारी घटना दिल्लीत समोर आली आहे. दुहेरी हत्याकांडाने दिल्ली पुन्हा एकदा हादरली आहे. शाहदरा परिसरात सासू आणि सुनेची निर्घृण हत्या करण्यात आली. इतकंच नाहीतर घरातील दागिने आणि रोख रक्कम चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती आहे तर सध्या पोलीस मारेकऱ्यांचा शोध घेत असल्याचं सांगण्यात येत आहे.**


मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीतील शाहदरा भागात सासूची हत्या करण्यात आली आहे. घरात घुसून चोरट्यांनी ही घटना घडवली. मिळालेल्या माहितीनुसार, डॉली रॉय आणि तिची सासू विमला देवी घरात एकट्या होत्या. डॉलीची दोन्ही मुले दिल्लीबाहेर गेली होती. मंगळवारी पहाटे मुले घरी परतली असता, वारंवार फोन करूनही कोणीही दरवाजा उघडला नाही. यानंतर मुलांनी दुसऱ्या चावीने दरवाजा उघडला तेव्हा घरात आई आणि आजीचे रक्ताने माखलेले मृतदेह पडले आढळले. यानंतर घरात तपास केला असता घरातून दागिने आणि रोख रक्कमही गायब होती. तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, चोरटे हे ओळखीचे असावेत, असा पोलिसांचा संशय आहे.

## कांदा दर आंदोलनावरून शेतकरी संघटनांमध्ये फाटाफूट

सुराज्य/नाशिक

**कांद्याला उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळत असल्याने होणाऱ्या नुकसानीकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने मंगळवारपासून पुकारलेल्या बेमुदत कांदा विक्री बंद आंदोलनाला शरद जोशीप्रणीत शेतकरी संघटनेने विरोध केला आहे. बाजार बंद करून कोणताही फरक पडणार नाही. उलट या काळात व्यापारी आपला कांदा बाजारात उपलब्ध करून लाभ उठवतील.**

दक्षिणेकडील नवा कांदा लवकरच बाजारात येत असल्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आपला माल टप्प्याटप्प्याने विक्री करावा,



असे आवाहन केले.

या विरोधामुळे कांदा उत्पादक संघटनेला एक पाऊल मागे घ्यावे लागले. बेमुदतऐवजी एका दिवसापुरते आंदोलन करण्याचे बदल करावे लागले. उन्हाळ कांद्याचे उत्पादन अधिक झाल्यामुळे पुढील काळात दरात सुधारणा होण्याची शक्यता नसल्याचे या क्षेत्रातील जाणकार सांगतात.

सात-आठ महिन्यांपासून कांद्याला कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचे कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे म्हणणे आहे. लिलावात उत्पादन खर्चापेक्षा जास्त म्हणजे २५ रुपये किलोचा दर न मिळाल्यास १६ ऑगस्टपासून कांदा विक्री बंद आंदोलन करण्याचे संघटनेने जाहीर केले होते. कांद्याचे भाव वाढल्यास सरकार निर्यातबंदी करते. परदेशी कांदा आयात करते. कांदा व्यापाऱ्यावर छापे टाकते. साठ्यांवर मर्यादा घालते. अशा क्लृप्त्या वापरून दर पाडले जातात. मात्र कांदा मातीमोल भावाने विकला जात असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते, असे संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी म्हटले होते. या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी संघटनेने १६ ऑगस्टपासून बेमुदत कांदा विक्री थांबवण्याचे गावोगावी आवाहन केले.

## कोर्टातच पत्नीचा गळा चिरला

सुराज्य/बंगळुरु

कर्नाटकमध्ये एक भयानक घटना घडली आहे. पतीने पत्नीचा गळा चिरुन हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. दोघा पती-पत्नींमध्ये वाद होते. त्यामुळं त्यांनी कौंटुबिक न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. यानंतर दोघांचं काऊंसिलिंग सेशन झालं, यावेळी दोघांनीही मुलांसाठी सुखी संसार करण्याचं मान्य केलं होतं. मात्र, कोर्टातून बाहेर पडताच पतीने केलेल्या कृत्यामुळं सगळेच हादरले आहेत.




होलेनरसीपुरा येथील टाउन परिसरात ही घटना घडली आहे. मयत महिलेचे नाव चैत्रा असून आरोपी पतीचे नाव शिवकुमार आहे. चैत्रा थट्टेकेरे गावची रहिवासी आहे तर आरोपी होलेनरसीपुरा तालुक्यात राहतो. आरोपीने पत्नीवर हल्ला करताच तिथून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तिथे असलेल्या लोकांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे.

चैत्रा आणि शिवकुमार यांचं लग्न सात वर्षांपूर्वी झालं होतं. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यात वाद होत होते. त्यामुळं त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केल्यानंतर पती-पत्नी दोघेही समुपदेशन सत्रासाठी गेले होते.

समुपदेशन सत्रादरम्यान, पती-पत्नीने मतभेद विसरून एकत्र राहण्याचे आणि त्यांच्या लग्नाला आणखी एक संधी देण्याचे मान्य केले होते. आपल्या मुलांसाठी आम्ही पुन्हा एकत्र राहू, असं न्यायाधीशांसमोर दोघांनीही मान्य केलं होतं. समुपदेशन सत्रानंतर दोघंही कोर्टातून बाहेर पडले. बाहेर आल्यानंतर चैत्रा प्रसाधनगृहाकडे जात असताना शिवकुमारने पाठीमागून तिच्यावर हल्ला केला. पत्नीवर हल्ला केल्यानंतर त्याने मुलांवरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, लोकांनी त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले.

पत्नीवर हल्ला केल्यानंतर शिवकुमार घटनास्थळावरुन पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. मात्र, लोकांनी त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. चैत्राला होलेनरसीपुरा रुग्णालयात तातडीने दाखल केले. मात्र गंभीर जखम व अधिक रक्तस्त्राव झाल्याने रुग्णालयात नेत असतानाच चैत्राचा मृत्यू झाला.

शिवकुमारवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याची अधिक चौकशी करण्यात येत आहे. आरोपी कोर्ट परिसरात धारदार शस्त्र घेऊन कसा आला, याचाही तपास करण्यात येत आहे.

## नियोजनामुळे यंदा पुराचा धोका टळला

सुराज्य/कोल्हापूर : यावर्षीच्या पावसाळ्यात पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांना दोन वेळा पूर आला. कोल्हापुरातील पंचगंगा नदीने इशारा पातळी ओलांडून धोका पातळी गाठण्याची धाव सुरू ठेवली. महापुराचा धोका दोन्ही वेळी टळला असला तरी पुराचे पाणी कृष्णाकाठच्या शेत-शिवारात घुसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महापुराला कर्नाटकातील अलमट्टी धरण कारणीभूत असल्याची चर्चा - वाद पुन्हा रंगला आहे. महाराष्ट्र - कर्नाटक राज्यातील जलसंपदा विभागाने जल प्रचालन व्यवस्थापनात समन्वय ठेवल्याने अधिक धोका झाला नाही, असेही यंदाचे निरीक्षण आहे. पश्चिम महाराष्ट्र सातत्याने महापुरात लोटला जात आहे. २००५ आणि पुढच्याच वर्षी तसेच २०१९ आणि गतवर्षी अशा चार वेळा प्रलयकारी महापुराचा फटका कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील कृष्णा, पंचगंगा, वारणा या प्रमुख नदीकाठच्या भागाला बसला.

## उत्तरप्रदेशमध्ये तिरंगा यात्रेत नथुराम गोडसेचे छायाचित्र

सुराज्य/उत्तरप्रदेश

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देशात अनेक ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. अशाच एका यात्रेदरम्यान उत्तर प्रदेशच्या मुजफ्फरनगरमध्ये नथुराम गोडसेच्या फोटोसह यात्रा काढल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अखिल भारतीय हिंदू महासभेने ही यात्रा काढली असून या यात्रेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## अतिवृष्टीनंतर मराठवाड्यातील शेतकरी हवालदिल

सुराज्य/औरंगाबाद : वसमत तालुक्यातील कुरुंदा येथील बंडू इंगोले यांची मुळातच दोन एकर शेती. या दोन एकरांतील सोयाबीन पूर्णत: गेले. अतिवृष्टीमध्ये जलेश्वर नदीला पूर आला. त्यात एक म्हैस-वासरू वाहून गेले. आता त्यांच्यासमोरचे प्रश्न अधिक किचकट बनले आहे. कळमनुरी तालुक्यातील कान्हेगाव येथील शेतकरी पुंडलिक वाघमारे यांचे जगणेही आता मुश्कील बनले आहे.

मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांतील सात लाख ४ हजार शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पंचनामे पूर्ण होऊन मदतीची मागणी करण्यात आल्यानंतर निकषापेक्षा दुप्पट मदत देण्याचा राज्य सरकारने निर्णय जाहीर केला असला, तरी ती मदत मिळणार कधी, हा प्रश्न अनुत्तरित आहे. मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड, हिंगोली या दोन जिल्ह्यांतील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अनेकांची शेती खरवडून गेली आहे. पिकेही हातची गेली असल्याने शेतकरी हवालदिल आहेत. शिवसेनेकडे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पद आल्यानंतर अंबादास दानवे यांनी नुकताच या भागाचा दौरा केला. तत्पूर्वी अजित पवार यांनीही शेतकऱ्यांना मदत मिळावी, अशी मागणी सरकारकडे केली होती; पण नदीकाठच्या काही शेतकऱ्यांचे सारेच वाहून गेल्याने त्यांच्या अडचणी खूप अधिक आहे.

### ५०० कोटींचा नफा देतो, असे सांगत दोघांची फसवणूक

## 'ते' भांडे नासाला ५ हजार कोटींना विकायचे आहे

सुराज्य/नवी दिल्ली

**पुण्यातील हिंजवडी येथे एका निलंबित रेल्वे अधिकाऱ्याला ४९ लाखांची फसवणूक केल्या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी अटक केली आहे. या निलंबित अधिकाऱ्याने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जास्त नफा मिळवण्याचे आमिष तर दाखवलेच, परंतु आरपी धातूचे भांडे 'नासा' या अमेरिकन संशोधन संस्थेत ५ हजार कोटींना विक्री करून पाचशे कोटींचा फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवत दोघांची तब्बल ४९ लाखांची फसवणूक केली.**

अटक करण्यात आलेला रेल्वेचा निलंबित अधिकाऱ्याचे नाव रॉबर्ट उबल्डो रोझीरिओ असे असून तो खडकी येथील रहिवासी आहे. या अगोदर या गुन्ह्यात सोनाली उमाकांत जाधव (रा. सांगवी), पूजा गरुड (रा कोथरूड), संगीता नगरकर (रा कोथरूड), नवनाथ लांडगे (रा पौड), मेहुल गांधी आणि सतीश मुकेरकर यांना अटक करण्यात आली होती.

याप्रकरणी सुभाष गुलाब ससार (वय ४९, रा. सुसगाव, मुळशी) यांनी फिर्याद दिली आहे.




या फसवणुकीच्या प्रकरणाबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी आणि त्यांचे भाऊ प्रकाश गुलाब ससार, राजेश गुलाब ससार यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास जास्त फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखविले. यासोबतच 'आरपी' नावाच्या धातूचे मौल्यवान भांडे 'नासा' या अमेरिकन संशोधन संस्थेला विक्री करण्यात येणार असून त्याची किंमत ५००० कोटी मिळणार इतकी मिळणार आहे, असे सांगितले. त्यामधून ससार बंधूंना ५०० कोटी रुपयांचा फायदा मिळणार असल्याचे आमिष त्याने दाखवले होते. त्यांचा विश्वास निर्माण करण्यासाठी त्याने १०० कोटींची बनावट कागदपत्रे बनवून घेत ती ससार बंधूंना त्याने दिली होती.

गेल्या काही दिवसांपासून रॉबर्ट उबल्डो रोझीरिओ हा पोलिसांना गुंगारा देत होता. तसेच तो मोबाइल आणि राहण्याची जागा सतत बदलत होता. तसेच गोवा आणि बंगलोरमध्ये तो राहत होता.

मात्र, पोलिसांना हा दापोडी येथे रहात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार हिंजवडी पोलिसांनी त्याला सापळा रचून ताब्यात घेतले आहे.

# आरोग्यमंत्री तानाजी सावंत निष्ठावान कार्यकर्त्यांच्या दारी; दिली दहा लाखांची मदत, घेतली मुलांच्या नोकरीची जबाबदारी

सुराज्य/सोलापूर

ज्या पक्षात जाल त्या पक्षात मिळतो, तो कार्यकर्ता. नेत्यांच्या मागे-पुढे पळतो, तो कार्यकर्ता. गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सत्तेचे समीकरण जुळवतो, तो कार्यकर्ता. घराकडे दुर्लक्ष करून पक्षासाठी राबराब राबतो तो देखील कार्यकर्ताच. पण अशाच एखाद्या निष्ठावान कार्यकर्त्यांचे आकस्मिक निधन झाल्यास त्याचे कुटुंब उघड्यावर येते.पण आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचासारखा नेता असल्यास कार्यकर्त्यापश्चात देखील कुटुंबाला एक हक्काचा आधार मिळतो. संकटातील घराला भाऊ मिळतो, याची जाणीव महाराष्ट्राला धाराशिव येथील घटनेने झाली आहे.

## धाराशिव येथील जावळे कुटुंबाची सांत्वनपर भेट



धाराशिव तालुक्याचे माजी तालुकाप्रमुख दिलीप जावळे या शिवसैनिकाचे आकस्मिक निधन झाले. पक्षाचा एक कार्यकर्ता गेला असला तरी एका कुटुंबाचा मात्र मोठा आधार गेला होता. याची जाणीव असलेल्या आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी जावळे कुटुंबाला आधार देण्यासाठी सांत्वनपर भेट घेतली.

सांत्वनपर कोरडे अश्रू ढाळून केवळ फोटोसेशन न करता त्यांनी १० लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश कुटुंबाच्या हाती ठेवला. मोठ्या भावाप्रमाणे मायेचा संवाद साधत चिंता करू नका, हा भाऊ तुमच्या पाठीशी आहे, असे सांगत मानसिक आधार दिला. एवढे बोलून न थांबता कुटुंबाच्या अर्थाजनाचा कायमस्वरूपी प्रश्न मिटवण्यासाठी दोन्ही मुलांच्या नोकरीची जबाबदारी स्वीकारली. भविष्यात काही अडचण आल्यास भाऊ पाठीशी आहे, असा पुन्हा एकदा विश्वास दिल्याने छत्र हरपलेले जावळे कुटुंब या सांत्वनपर भेटीने भारावून गेले. महाराष्ट्रात कोट्यवधी रुपयांची संपत्ती असणारे अनेक पुढारी आहेत मात्र समाजाप्रती, आपल्या कार्यकर्त्याप्रति दानत दाखवल्याने सावंत यांची चर्चा होत आहे.


### यापूर्वीही लाखोंची मदत

तानाजी सावंत आज मंत्री आहेत म्हणून त्यांनी मदत केली आहे असे नाही. सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणासाठी काही युवकांनी आत्महत्या केल्या. शाहिद झालेल्या युवकांच्या घरची परिस्थिती पाहून तानाजी सावंत यांनी ४२ कुटुंबांना १ लाख रुपयांची मदत केली होती.



सुराज्य सोलापूर
२० वा वर्धापन दिन
सोलापूर ३६०°

# ऊस पट्ट्यात फळ लागवडीचे कोंदण



## शिवाजी हळणवर

शेती अभ्यासक,
ईश्वर वठार, ता. पंढरपूर
मो. ९८६००४००१३

सोलापूर जिल्ह्यात ज्वारी, मका, तूर, बाजरी, सोयाबीन, उडीद याव्यतिरिक्त क्वचितच पिकाची लागवड शेतकरी करायचे. द्राक्षे, डाळिंब आणि केळी या फळपिकांबरोबर आता आंब्याचे उत्पादनही शेतकरी घेत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील या बदलत्या पीक पध्दतीबाबत बरेच काही सांगता येईल. सोलापूर जिल्ह्यात ज्वारी, मका, तूर, बाजरी, सोयाबीन, उडीद याव्यतिरिक्त क्वचितच पिकाची लागवड शेतकरी करायचे. पुढे उजनी धरण, भीमा नदी, सीना नदी, तलाव आदी सिंचनांच्या कामामुळे हळूहळू जिल्ह्यात बागायत क्षेत्र वाढले.

सोलापूर जिल्हा हा पूर्वीपासूनच 'अवर्षणग्रस्त जिल्हा' म्हणून ओळखला जातो. परंतु उजनी धरणाच्या निर्मितीनंतर जिल्ह्याची दुष्काळी ओळख पुसून 'बागायती जिल्हा' अशी नवी ओळख होऊ लागली आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षामध्ये उजनी धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतीमध्ये अमुलाग्र असे बदल झाले आहेत. केवळ उजनीच्या पाण्यामुळे सोलापूर जिल्हा ऊस उत्पादनात राज्यात आघाडीवर आहे.

जिल्ह्यात जवळपास ३५ साखर कारखाने आहेत. दरवर्षी या कारखान्यांमधून सुमारे १ कोटी टन उसाचे गाळप केले जाते. कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक उलाढालीमुळे ग्रामीण भागातील विकासालाही चालना मिळाली आहे. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षापासून जिल्ह्यातील पावसाचे प्रमाण हे सरासरी ५० टक्क्यांपेक्षाही कमी झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उजनी धरणातील पाण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. यामुळे जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ, बार्शी या भागातील शेतकऱ्यांनी पारंपरिक ऊसशेतीत बदल करत फळपिकांच्या शेती करण्याचा पर्याय शोधला आहे. उसाऐवजी कमी पाण्यावरची भाजीपाला, फळबागा व इतर पिके घेतल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते व पर्यायाने कारखानदारांकडून होणारी पिळवणूक रोखता येणे शक्य आहे. हे दाखवून देण्यास आता सुरुवात झाली आहे. मात्र, पश्चिम महाराष्ट्राच्या पट्ट्यात बडे साखरसम्राट असल्यामुळे आपसूकच शासनावर त्यांचा अंकुश राहतो. त्यामुळे पाण्याचे काटेकोर नियोजन करायचे म्हटले, तरी राजकीय दबावामुळे अधिकाऱ्यांना ते शक्य होताना दिसत नाही. मात्र, सद्यस्थितीत राजकीय दबाव झुगारून निर्णय घेणे, ही काळाचीच गरज आहे. साखरसम्राटांनीही जिल्ह्यातील पाण्याचे गहिरे संकट ओळखून कमी पाण्यावर येणारी फळशेती करण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देऊन शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती सुधारण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. तर भविष्यातील पाण्याची टंचाई लक्षात घेता शेतकऱ्यांनी शेतीच्या अर्थशास्त्राचा अभ्यास करून पीक पध्दती बदलण्याची गरज आहे.



### सोलापूरची केळी आता परदेशात!

शेंगा चटणी, हुरडा, चादर, द्राक्षे आणि डाळिंब यासाठी प्रसिध्द असणाऱ्या सोलापुरातून आता केळीचेही चांगलेच उत्पादन घेतले जाऊ लागले आहे. सोलापुरातून केळी निर्यात होऊ लागली आहे. सोलापूर जिल्ह्यातील या बदलत्या शेतीच्याबाबतीत आता सोलापूरशी बोलावे लागेल. सोलापूरची चादर, सोलापूरची शेंगा चटणी, सोलापूरचे डाळिंब, सोलापूरची कडक भाकरी अशा अनेक उत्पादनात आता सोलापूरची केळी असेही म्हणावे लागणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यात सध्या केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. नुसते उत्पादनच नव्हे तर सोलापुरातून मोठ्या प्रमाणावर केळी निर्यातही होऊ लागली आहे. यात आघाडीवर असलेल्या करमाळा तालुक्यातील कंदर आणि परिसरातील आठ ते दहा गावांत या केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असून आता येथील केळींची निर्यातही होऊ लागल्याने सोलापूर आणि केळी असे नवे नाते तयार झाले आहे.

करमाळा तालुक्यात केळी पिकाखाली सुमारे ३२०० हेक्टर पेक्षा जास्त जमीन आहे. यापैकी सुमारे दीड हजार हेक्टर जमीन या दहा गावात लागवडीखाली आहे. कंदर, वांगी, बिटरगाव, सांगवी, चिखलठाण, ढोकरी, सोगाव पूर्व, सोगाव पश्चिम, शेटफळ, शेलगाव आदी गावात केळीखालील पिकात गेल्या पाच ते दहा वर्षांत चांगली वाढ झाली आहे. ऊस दरातील अनियमितता, घटती उत्पादकता, केळी पिकामधून मिळणारे जास्त आणि शाश्वत उत्पन्न, उसाच्या तुलनेत लवकर पैसे मिळत असल्याने या परिसरातील तरुण शेतकरी केळी पिकाकडे वळला, कंदर आणि परिसरातील सर्व गावे उजनी धरणाच्या काठावर आहेत. त्यामुळे या सर्व गावातील शेती पूर्ण सिंचनाखाली आहे. केळी उत्पादनासाठी आवश्यक असणारे हवामान या परिसरात आहे. केळीच्या उत्पादनासाठी आर्द्रता ४५ टक्के लागते. मात्र उजनी धरणाच्या जलाशयामुळे या परिसरातील सर्व गावात ६५ टक्के आर्द्रता असते. या हवामानामुळे केळीचे उत्पादन तर वाढतेच, त्याचबरोबर केळीचा आकार आणि रंगही आकर्षक असतो. 'सनस्टार ए-वन ॲग्री प्रोडयुसर' कंपनीच्या माध्यमातून १००टन केळी निर्यात केली जाते. केडी ॲग्रो प्रॉडक्ट कंपनीच्या माध्यमातून देशात केळी पाठवण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर अरब आणि युरोपीय देशांत निर्यात सुरू केली आहे. केळी निर्यात सुरू झाल्याने शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळू लागले आहेत, त्यामुळे केळी पिकाकडे येथील शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. केळीच्या उत्पादनामुळे कंदर आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात चांगली वाढ झाली आहे. त्याचा परिणाम परिसरातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यात झाला आहे. उत्पन्नात वाढ झाल्याने शेतीमध्ये अत्याधुनिकता आली आहे. विशेषत:: फेब्रुवारी ते जून महिन्यात मोठ्या प्रमाणावर मागणी असते. यंदाच्या वर्षांत २,१४० टन म्हणजेच सुमारे



१०० कंटेनर केळीची निर्यात झाली आहे. केळी सौदे अरेबिया, अफगाणिस्तान, इराण, ओमान, कतार आणि रशिया आदी देशात निर्यात होतात. यामुळे येथील शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. या परिसरातील आर्थिक उलाढाल वाढली आहे. परंतु पायाभूत सुविधा निर्माण झाल्यास आणखी निर्यात वाढू शकते. यामध्ये रस्ते, पाणी, वीज वितरण आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी यामध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.

आमचे नेते
मा.श्री.उत्तमराव जानकर
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते
दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक सौ.अश्विनी भानवसे
राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर जिल्हा महिला उपाध्यक्षा
सौ.अश्विनी भानवसे

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
क्रीडा शिक्षक
शुभेच्छुक
सतीश कदम सर
क्रीडा शिक्षक, इंग्लिश स्कूल, वेळापूर
मा.सतीश कदम सर

मा.दयानंद शेळके मा.दत्तात्रय शेळके मा.दिगंबर शेळके
दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
चेअरमन : दत्तात्रय तुकाराम शेळके, दयानंद जगन्नाथ शेळके
स्वस्त धान्य दुकान, माळखांबी, ता.माळशिरस | भैरवनाथ दुग्ध डेअरी, माळखांबी

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
प्रो.प्रा.अरुण वाघ
मो.9860645975
दुकान : 7719000920
9970113928
नागराज बारदाणा ट्रेडर्स
मका बारदाणा
कांदा बारदाणा
आमच्याकडे सर्वप्रकारचे सुतळी नवीन व जुने बारदाणा खरेदी व विक्री होलसेल दरात केली जाईल. तसेच सर्व प्रकारची (काळी) प्लास्टिक बारदाणे मिळतील.
मा.अरुण वाघ
मु.पो.वेळापूर यशोधन हॉस्पिटल शेजारी, पुणे-पंढरपूर रोड, वेळापूर

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
▪ शक्ती वाईन शॉप, श्रीपूर, ता.माळशिरस
▪ शक्ती कलेक्शन, बोरगाव, ता.माळशिरस
▪ शक्ती हॉटेल, श्रीपूर, ता.माळशिरस
▪ जवाहिरे एंटरप्रायजेस, श्रीपूर
▪ सत्यसूर्य शेतीफार्म, बोरगाव, जांबूड

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
मार्गदर्शक मा.दिलीपरावजी माने
स्फूर्तीस्थान मा.पृथ्वीराज माने
तालुकाध्यक्ष मा.सुनील जाधव
शुभेच्छुक
वसा समाजसेवेचा, प्रगतीचा, विकासासाठी, हक्कासाठी लढारी संघटना
पृथ्वीराज माने युवा मंच
SJ फ्रेंन्डस्, गुळवंची, उत्तर सोलापूर

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
दुर्गा हॉटेल
नागठाना, खंडाळी, ता.माळशिरस

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
मा.रणजितसिंह कदम
मा.अध्यक्ष तंटामुक्ती पुरस्कार प्राप्त समिती, खंडाळी

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
सामाजिक कार्यकर्ते
अमोल महावीर मेथा
खंडाळी, ता.माळशिरस

डॉ. दगडे होमिओपॅथिक क्लिनिक
थांबा...
शस्त्रक्रिया हा अंतिम उपाय नक्कीच नाही, एकदा शस्त्रक्रिया कराल परंतु नंतर काय ? म्हणुन आपणास जर
मुळव्याध, मुतखडा
असेल तर आपण आपल्या होमिओपॅथीक तज्ञाला अवश्य भेटा....
गुडघेदुखीवर विना चिरफाड करता खात्रीशीर उपचार
डॉ. नागनाथ दगडे (BHMS)
9970554004 / 9975956204

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा...
प्रगतशिल बागायतदार
पांडुरंग गोविंदराव माने-देशमुख
शुभेच्छुक
अतुल माने-देशमुख
(प्रगतीशील बागायतदार)

दैनिक सुराज्य सोलापूर २० व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा!
जाणता राजा मा.श्री.जयसिंह मोहिते-पाटील
उपसरपंच उघडेवाडी मा.श्री.नितीन चौगुले
शुभेच्छुक
नितीन चौगुले
तालुकाध्यक्ष : युवक परिट समाज संघटना

दैनिक सुराज्यच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
पाटील ऑटोमोबाईल्स
स्वराज ट्रॅक्टर टेंभुर्णी/श्रीपूर
मो.९८९०५६८०८०